कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे

# संपर्क





• पुणे • वर्ष १३ वे • अंक २ रा • जुलै-सप्टेंबर २०१६ • किंमत रु. २०/- • पृष्ठसंख्या ४० • वार्षिक वर्गणी रु. १००/-

''संपर्कात राहू या... संपर्क वाढवू या!!''

Karhade Brahmin MahaSangh

॥ वसुधैव कुटुम्बकम् ॥

ESTD. 1991





# BRINGING KONKAN TO YOU




Our expertise in creating premium quality residences at prime locations is now moving to Urawade, Pirangut.
Offering 1 & 2 BHK Quality Residences, a community well-connected to IT, industrial and city destinations.
Experience 'resort living' now in Pune!

## COMING SOON

A JV PROJECT BY

PANDIT JAVDEKAR | ATB PROPERTIES

CALL 99210 30392 | 95450 94355

OFFICE ADDRESS: Krishnakunj Apartments, Bharti Niwas Chowk, off Income Tax Lane, 64/31, Erandwane, Pune 411 004
P: +91 20 2545 8334 / +91 20 2545 7217 I E: sales@panditjavdekar.com I w: panditjavdekar.com I /PanditJavdekar

SITE ADDRESS: Gat No.: 308 & 310, Village Urawade, Tal. Mulshi, Dist. Pune 412 108

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे

# संपर्क

संपर्कात राहु या ! संपर्क वाढवू या !!

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ

ॐ

स्थापना १९९१



कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाने कऱ्हाडे ज्ञाती बांधवांसाठी चालविलेले नियतकालिक (खाजगी वितरणासाठी)

वर्ष १३ वे | जुलै–सप्टेंबर २०१६ | अंक २ रा

अध्यक्ष : श्री. विजय आंबर्डेकर
**मोबा. : ९८१९८८५६६५**

सचिव : श्री. गणेश गुर्जर
**मोबा. : ९८९०९९०११३**

कोषाध्यक्ष : श्री. संजय आंबर्डेकर
**मोबा. : ९८२०४ १७९८१**

**संपादक मंडळ**

**मुख्य संपादक :**
**श्री. श्रीगजानन गुर्जर**
पुणे ९९७०१७४८१८

**शहर प्रतिनिधी**
श्री. प्रसाद पंडीत गिरगांव, मुंबई, ९८६९१५५२१५
श्री. चंद्रशेखर जोशी, बेळगांव, ९४४९०५१६५३
श्री. प्रदिप हळबे, डोंबिवली, ९८३३१६३६५९
श्री. अविनाश जावडेकर, नागपूर ९८६०२५७३१५
सौ. अंजली माईणकर, सोलापूर, ८८८८२२१७४६
सौ. मानसी मोघे, सातारा, ०२१६२-२३३६४३
श्री. सुनिल जठार, रत्नागिरी/राजापूर, ९२७०५७९४००
श्री. आनंद खंडकर, कोल्हापूर, ९८५००८८८७४
श्री. जयंत लघाटे, मुलुंड, ९९६९०३७३४१
श्री. गोपाळ भाटवडेकर, पुणे, ९८५०९७९७०६
श्री. नरेंद्र पानवलकर, बडोदा, ९२२७१३५७९४
श्री. शरद खांडेकर, सांगली, ९८२२९९५८९२
श्री. अजित सरवटे, ठाणे, ९८८७२०५६९०
सौ. सुप्रिया फणसळकर, नाशिक, ९४०३१४८७७५
श्री. विनायक उमर्ये, आजगांव, जि. सिंधुदूर्ग, ९४२३८८०१३८
श्री. गजानन साईनेकर, गोवा, ९९२३७९९६९७

**ऑफिस संपर्क : ८१४९९०७७८९**
email : bkbmsindia@gmail.com

**कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे संपर्क हे त्रैमासिक मालक, कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ (ट्रस्ट) यांचेसाठी मुद्रक श्री जे प्रिंटर्स प्रा. लि., सदाशिव पेठ, पुणे येथे छापून ४३७, नारायण पेठ, अनिश प्रासाद अपार्टमेंट, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केले.**
**संपादक – श्री. श्रीगजानन गुर्जर**

## आवाहन

'संपर्क'च्या सर्व वर्गणीदारांस या द्वारे आवाहन करण्यात येते की आपली वार्षिक वर्गणी रु. १००/– (रुपये शंभर मात्र) आपल्या शहर प्रतिनिधींकडे जमा करावी (शक्यतोवर तीन वर्षासाठी रु. ३००/– किंवा ५ वर्षासाठी रु. ५००/– भरल्यास सोईचे होईल). शहर प्रतिनिधींकडे प्रत्येक सभासदाची वर्गणी कोणत्या महिन्यापासून येणे आहे, त्याच्या याद्या पाठवल्या आहेत. त्यानुसार शहर प्रतिनिधींशी संपर्क करुन वर्गणी जमा करावी. शहर प्रतिनिधींनी जमा झालेली वर्गणी आपल्या नजिकच्या बँक ऑफ इंडियाच्या शाखेत कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाच्या खाते क्रमांक ०५५२१०११०००४००८ वर कर्वेनगर, पुणे शाखेमध्ये जमा करून यादी आणि जमा पावती पुणे कार्यालयाकडे पाठवावी. बँक ऑफ इंडिया, IFSC Code BKID0000552. कोणत्याही अंकापासून वर्गणीदार होता येते. किरकोळ अंक विक्री नाही.

**संपादक : श्रीगजानन गुर्जर**

## जाहिरातीचे दर

| पान | एकवेळ | चारवेळा |
|---|---|---|
| पाव | ४००/– | १५००/– |
| अर्धा | ८००/– | ३०००/– |
| पूर्ण | १६००/– | ६०००/– |
| शुभेच्छा | २५०/– | १०००/– |
| पुर्ण पान रंगीत | २५००/– | १००००/– |

**नियतकालिकाचे नाव :** कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे 'संपर्क'
**पत्ता :** कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ,
**द्वारा :** कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ,
'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ,
पुणे – ४११ ०३०
**संपादक :** श्री. श्रीगजानन गुर्जर
**मुद्रक :** श्री जे प्रिंटर्स प्रा. लि.
१४१६, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.



सुरुवात कशी झाली यावर बऱ्याच घटनांचा शेवट अवलंबून असतो.

संपर्क

# अनुक्रमणिका


- कचऱ्यातून फुलवा बाग व करा नंदनवन – अर्थात जैविक बगीचा (बायो–कल्चर) ४
- ।। श्रीराम समर्थ ।। श्रीभागवत सुभाषित – लक्ष्मीकांत जोशी ६
- रौप्यमहोत्सव कार्यक्रम :

  भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचा रौप्यमहोत्सव - गणेश गुर्जर ८
- माझी ताई – कविता – सौ.उज्ज्वल मोहन नागराज १०
- वाटचाल सुवर्णयुगाकडे – सुहास भा. भागवत ११
- अभिप्राय – डॉ. आरेन हर्डीकर १२
- रौप्यमहोत्सवामधील मा. श्री गुरू बालाजी तांबे यांचे भाषण १३
- महिमा आईचा–कविता – सौ.सुनिता सरपोतदार १४
- रौप्यमहोत्सवामधील मा. श्री. सु. ग. शेवडे यांचे भाषण १५
- व्यक्ति परिचय : पंडित जितेंद्र अभिषेकी २१
- व्यक्ती परिचय : आंतरराष्ट्रीय क्रिकेट पंच ''श्री पद्माकर गोपाळ पंडित'' २२
- संस्थावृत्त:

  रणरागिणी राणी लक्ष्मीबाई स्मृतिदिन २३

  कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे – वासंतिक उत्सव २३

  झाशीच्या राणीचा स्मृतिदिन २४

  'वसंतोत्सव' कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुलुंड २४

  कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ – गो.भा. भाटवडेकर २५
- पदाधिकारी निवडणूक २०१६ २५
- देव देव्हाऱ्यात नाही.... २६
- रुचकर पाककृती – सौ. लीना मुळ्ये २८
- जरा हसा – केशव फडणीस २९


सदर नियतकालिकातील मजकूराशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. – संपादक

# संपादकीय



कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाच्या रौप्यमहोत्सवी वर्षात नव्या कार्यकारिणीद्वारे प्रकाशित होत असलेल्या 'संपर्क' त्रैमासिकाचा प्रथम अंक आपल्या हातात देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

या आधी घोषित केल्याप्रमाणे १० एप्रिल २०१६ रोजी कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचा 'रौप्यमहोत्सवी सोहळा' मोठ्या जल्लोषात, सर्व सभासद संघांच्या कार्यकारी मंडळांच्या सहकार्याने, मोठ्या संख्येने हजेरी लावलेल्या सर्वसाधारण सभासदांच्या सान्निध्यात आणि बहुसंख्येने उपस्थितीत असलेल्या मान्यवरांच्या सहभागाने पुण्यात 'संकल्प' मंगल कार्यालयात संपन्न झाला.

ह्या कार्यक्रमात विविध क्षेत्रांत ज्या कऱ्हाडे ब्राह्मण बांधवांनी उत्कृष्ट कार्य करून आपल्या कार्याचा ठसा जनमानसावर उमटविला आहे, अशा ३३ मान्यवरांना सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. ह्या मान्यवरांमध्ये डॉ. श्री. बालाजी तांबे, प्रा. श्री. प्र. चिं. शेजवलकर, श्री. सु. ग. शेवडे आदी प्रभृतींनी प्रगट केलेल्या आपल्या उद्‌बोधक व बहुमोल विचारांनी उपस्थितांची मने जिंकली.


ह्याच कार्यक्रमात सौ. इला भाटे यांच्या शुभ हस्ते संघाची माहिती असलेली 'कऱ्हाडा तितुका मेळवावा' ही स्मरणिका प्रकाशित करण्यात आली व उपस्थित सर्वांना त्याच्या प्रती देण्यात आल्या. सकाळपासून चालू झालेला हा हृद्य सोहळा संध्याकाळी मिश्रगीतांच्या कार्यक्रमाने संपन्न झाला.

महासंघाच्या नव्या कार्यकारिणीची निवड दिनांक ८ मे २०१६ रोजी विशेष सर्वसाधारण सभेत नाशिक येथे झाली. त्यात सर्वसंमतीने पुढील कार्यकारिणी बिनविरोध अस्तित्वात आली.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. विजय आंबर्डेकर | अध्यक्ष (क. ब्रा. संघ, मुंबई) |
| २) | श्री. नागराज उपांगला<br>Shree. Nagraj Upangala | उपाध्यक्ष<br>Vice-Chairman (Karada Brahmana Samaja, Banguluru) |
| ३) | श्री. गणेश गुर्जर | सचिव (क. ब्रा. संघ, पुणे) |
| ४) | श्री. संजय आंबर्डेकर | कोषाध्यक्ष (क. ब्रा. संघ, ठाणे) |
| ५) | श्री. श्रीगजानन गुर्जर | संपादक (क. ब्रा. संघ, पुणे) |
| ६) | श्री. अविनाश जावडेकर | कार्य. सभासद (क. ब्रा. संघ, नागपूर) |
| ७) | श्री. आनंद खंडकर | कार्य. सभासद (क. ब्रा. संघ, कोल्हापूर) |
| ८) | श्री. वासुदेव रायकर | कार्य. सभासद (क. ब्रा. संघ, डोंबिवली) |
| ९) | श्री. सुनील खेर | कार्य. सभासद (क. ब्रा. संघ, नाशिक) |


पुढील 'संपर्क'चा अंक दसरा-दिवाळी दरम्यान प्रकाशित होत असल्याने मी आपणांस आवाहन करतो की- आपण आपले विचारप्रवर्तक लेख, काव्य-कविता, माहितीपर लेख, प्रवासवर्णने, व्यक्तिविशेष, संघातील घडामोडी व इतर स्वरूपातील साहित्य आमच्याकडे पाठविल्यास प्रकाशनासाठी त्याचा योग्य विचार होईल. प्रथितयश लेखकांसाठी ही उत्तम संधी आहे, असे आवर्जून सांगावेसे वाटते.

चातुर्मासात येत असलेल्या विविध हिंदू सणांच्या निमित्ताने आपणा सर्वांना हार्दिक शुभेच्छा!



**श्री. श्रीगजानन गुर्जर**
संपादक

# कचऱ्यातून फुलवा बाग व करा नंदनवन – अर्थात जैविक बगीचा (बायो–कल्चर)





**ग्लो**बल वॉर्मिंगच्या विनाशकारी प्रलय संकटापासून समस्त मानवजातीला वाचवण्यासाठी जगभर चालू असलेल्या 'वसुंधरा बचाव' चळवळीत सहभागी होऊन इ.सन २००६ पासून पर्यावरणास पूरक असे अनेक उपक्रम आम्ही उभयतांनी घरी चालू केले. त्यातील आम्ही चालू केलेला एक अभिनव उपक्रम म्हणजे, आमच्या घरातील रोजचा निर्माण होणारा ओला कचरा (शिळे किंवा खराब झालेले अन्न व भाजीपाल्याचा टाकाऊ भाग) महानगरपालिकेच्या कचराकुंडीत न टाकता त्याचा पुनर्वापर करून पर्यावरणास हातभार लागावा, या उद्देशाने आम्ही नोव्हेंबर २००९ पासून आमच्या जुन्या घराच्या १४ फूट x १० फूट आकाराच्या गच्चीत बायो–कल्चर निर्मिती म्हणजेच जैविक बगीचा फुलवला असून ओल्या कचऱ्यापासून (ह्यामध्ये निर्माल्य, फळांच्या साली व बिया, चहाचा चोथा; कोथिंबीर, पालक, शेपू, मेथी, चाकवत, अंबाडी, माठ, चुका, मुळा, करडई इत्यादी पालेभाज्यांची देठे; शिळे, खरकटे वा आंबलेले अन्न, टाकाऊ धान्य व पोरकिडे झालेले धान्य, कोंडा, बुरशी आलेला पाव, मटारसाली, बिरड्यांची साले; कलिंगड, फणस, केळी, आंबा, संत्रे, मोसंबी, लिंबू इत्यादी फळांच्या साली, मटण व चिकनची हाडे, केसांचे गुंतवळ, नखे, खराब काळा गूळ इत्यादी जैविक विघटन होणारे काहीही) या बगीच्यात आत्तापर्यंत आम्ही आंबा, पेरू, चिक्कू, डाळिंब, करवंद, आवळा, कलिंगड, अंजीर, पपई, केळी, लिंबू इत्यादी विविध प्रकारची फळझाडे लावली असून वर्षाच्या आत त्यांचे नियमित उत्पादनही सुरू झाले आहे. तसेच आम्ही बागेत भाजीपाला (वांगी, टोमॅटो, पालक, मेथी, रताळी, हळद, आले, लसूण, कांदापात, वालपापडी, पावटा, कोथिंबीर, पुदिना, अळू, शेवगा, हादगा, मिरच्या, कारली, गवतीचहा, भेंडी, ओवा) लावला असून त्याचेही नियमित उत्पादन चालू झाले आहे. याखेरीज या मातीविरहित जैविक बागेत आम्ही अनेक जातींची फुलझाडे (अबोली, मोगरा, गुलाब, शेवंती, जाई, जुई, मदनबाण, कुंद, जास्वंद, झेंडू, निशिगंध, पारिजातक, रातराणी, अॅस्टर, सोनचाफा, ब्रह्मकमळ, डबलमोगरा, हजारी मोगरा, सदाफुली, तगर, इत्यादी.) लावलेली असून त्यांचे नियमित उत्पादनही घेत आहोत. सोबत आमच्या जैविक बागेचे काही फोटो नमुन्यादाखल दिलेले आहेत.

या जैविक बगीच्या पद्धतीत कोरडा कचरा– उदा. कागद, कांच, धातूचा पत्रा किंवा तार वगळता– ज्याचे विघटन होऊ शकते असा घरातील कोणताही नैसर्गिक ओला कचरा अगदी केसांचे गुंतवळ किंवा नखे अगर मेलेली झुरळे किंवा उंदीर–घुशीसुद्धा टाकू शकता.

बाजारात मिळणारी बायो–कल्चर पावडर म्हणजे एक प्रकारचे ओल्या कचऱ्याचे जलद गतीने विघटन होण्यासाठी आवश्यक असे एक प्रकारचे विरजण आहे. (जसे आपण घरी दुधापासून दही करताना दुधाला विरजण लावतो तसे) विघटन होऊ शकेल असा ओला कचरा– उसाचा रस काढून झाल्यावर उरणारी चिपाडे, नारळाच्या शेंड्या व करवंट्यांचे बारीक तुकडे,

वाळलेला पाला-पाचोळा, विटांचे २' आकारातील तुकडे व बायो-कल्चर पावडर (विरजण) यांचा वापर करून कुंडीत (मातीविरहित) आपण रोपे किंवा झाडे लावू शकता. माती वापरलीच तर फक्त एकदाच, तीही कुंडीच्या तळाच्या थरातच वापरावी. एकदा कचरा व कल्चर वापरण्यास सुरुवात केली की, मधे मधे पुन्हा मातीचा वापर करू नये.

**कुंडी :** कुंडी म्हणून बाजारात मिळणाऱ्या मातीच्या अगर प्लॅस्टिकच्या विविध आकाराच्या कुंड्या, पत्र्याचे गोल-चौकोनी आकारातील डबे, ड्रम्स, प्लॅस्टिकचे डबे, ड्रम्स, थर्मोकोलचे चौकोनी खोके- काहीही चालू शकते. माझ्या मते थर्मोकोलचे आयताकृती आकाराचे खोके सर्वांत उत्तम! आजकाल मेडिकलच्या डिस्ट्रिब्युटरकडून/दुकानातून अशी रिकामी खोकी मिळू शकतात. यात मातीचा वापर नसल्याने व थर्मोकोल वजनाने हलके असल्याने ज्येष्ठ व्यक्तींना या कुंड्या बागेत हाताळणे सोपे जाते, हे एक महत्त्वाचे कारण. दुसरे असे की, थर्मोकोल हे पाण्याने सडत अगर कुजत नाही, किंवा याच्यावर कसलाही रासायनिक परिणाम होत नाही.

**कुंडीत रोप लावण्याची पद्धत :** ज्या कुंडीत झाड/रोप लावायचे असेल, त्याच्या तळात व सर्व बाजूंनी तळापासून दोन इंच उंचीवर १० मि.मी. आकाराची मधे ४'' अंतर ठेवून भोके पाडावीत. त्यामुळे पाण्याचा व्यवस्थित निचरा होऊन रोपांच्या मुळांना प्राणवायू मिळू शकतो. नारळाच्या शेंड्या, विटांचे तुकडे व उसाची चिपाडे यांच्यामुळे ओलावा टिकून राहण्यास मदत होते. प्रथम कुंडीच्या तळाच्या ४'' उंचीच्या थरात विटांचे छोटे छोटे तुकडे, करवंट्यांचे तुकडे व पाला-पाचोळा किंवा या एकाच थरात वापरायची असेल तर माती यांचा थर देऊन त्यावर एक मूठ बायो-कल्चर पावडर (विरजण) पसरून पुन्हा ४'' उसाची चिपाडे, नारळाच्या शेंड्या, भाज्यांची देठे असा थर हाताने दाबून द्यावा व त्यावर पुन्हा एक मूठ बायो-कल्चर (विरजण) पावडर घालावी. याप्रमाणे थरावर थर द्यावे व कुंडी वरून २'' मोकळी ठेवून भरून घ्यावी. शेवटचा थर भरून झाल्यावर ३ मुठी बायो-कल्चर पावडर पसरावी. भरलेल्या कचऱ्यात मधोमध खड्डा करून बाजारातून आणलेले रोप बाहेरची प्लॅस्टिकची काळी पिशवी मुळांना धक्का न लावता फाडून टाकून ते रोप बुंध्यासह व मातीसकट त्या खड्ड्यात ठेवून बाजूला केलेला कचरा पुन्हा वर ओढून घ्यावा. वर एक मूठ निंबोळ्यांची पेंड घालावी. रोज एक वेळ पाणी देत जावे. आठ दिवसांनंतर भाजीपाल्याचा कचरा- फळांच्या साली, टरफले, भाज्यांची देठे व शिळे-पाके अन्न घालायला सुरुवात करावी. सुरुवातीस ४-६ महीने तरी कोबी व फ्लॉवर याचा पाला टाकू नये.

कचऱ्यास दुर्गंधी, कचऱ्यातून घाण पाणी, अळ्या, किंवा कचऱ्यावर माशा असा त्रास/समस्या उद्भवल्यास वरून आणखी बायो-कल्चर घालावे.

**या पद्धतीचे फायदे :** कचऱ्यास कसलीच दुर्गंधी येत नसल्याने ओल्या कचऱ्यामुळे प्रदूषणात होणारी भर टाळता येते. कचरा झाडात पाणी शोषून ठेवत असल्यामुळे पाणी कमी लागते. अन्य कुठल्याच खताची जरुरी लागत नाही. जास्ती तंत्राची जरुरी नसते. एक-दोन दिवस गावाला गेलात तरी काही फरक पडत नाही. मुळांना वाढीस लागणारे अन्न-पाणी जवळच मिळत असल्याने झाडाची वाढ लवकर होऊन फळे, फुले, भाज्या, शेंगा यांचे उत्पादन मातीच्या तुलनेत लवकर व मुबलक सुरू होते. (शेवग्याची 'बी' लावल्यापासून एका वर्षाचे आत मला शेवग्याच्या शेंगा खाता आल्या.)

**टीप :** बायो-कल्चर (विरजण) हे सुरुवातीस फक्त एकदाच वापरायचे लागते, पुन्हा-पुन्हा वापरावे लागत नाही.

रासायनिक खतांचा वापर टाळावा. किडीसाठी हळदीचे पाणी, तिखटाचे पाणी, कडुलिंबाची पाने घालून उकळून घेतलेले पाणी, तंबाखूचे पाणी यांचा वापर फवारणीसाठी करावा. आपल्या काही शंका असल्यास एकदा प्रत्यक्ष येऊन बाग बघा व शंकांचे निरसन करून घ्या.

बायो-कल्चर पावडर पुणे येथे **श्रीमती निर्मला लाठी** मोबाइल नं. ९८५०८ ४९८७० दूरध्वनी ०२० - २४४७ ४१०७. यांचेकडे मिळते.

Bio-culture powder is also available online on shopclue, amazon, snapdeal and other sites. Cash on Delivery is also available.


### संपर्कासाठी

**सौ. अनिता प्रमोद तांबे व श्री. प्रमोद लक्ष्मण तांबे**
**दूरध्वनी:** (०२०) २४४७४७८३, **भ्रमणध्वनी:** ९७३०९८८७११
श्री स्नेह-सेवा, १४१५, सदाशिव पेठ,
रेणुका स्वरूप मेमोरिअल गर्ल्स हायस्कूलशेजारी, एस. पी. कॉलेजसमोर,
खजिना महालच्या बोळात,
पुणे - ४११ ०३०. ई. मेल : pltambe@yahoo.co.in

# ।। श्रीराम समर्थ ।।
# श्रीभागवत सुभाषित

*दीर्घं श्वसन्ती वृजीनस्य पार -*
*मपश्यती बालकमहा बाला ।*
*माऽमङ्गलं तात परेषु संस्था*
*भुङ्क्ते जनो यत्परदुःखदस्तत् ।।*

(श्रीमद् भागवत ४/८/१७)



## भावार्थ

नक्षत्र लोकात अढळ पद प्राप्त करणाऱ्या ध्रुवाच्या आईचे – सुनीतीचे आपल्या मुलाला तू कसा वाग; हे सांगतानाचा भाव महर्षि व्यासांनी भागवतात मांडलेला आहे. या श्लोकाचा भावार्थ असा की, पुत्रा तू दुसऱ्याचे वाईट चिंतू नकोस. कारण जो मनुष्य दुसऱ्यांना दुःख देतो, त्याला स्वतःच त्याचे फळ भोगावे लागते.

कर्म सिद्धांताची फलरुप भूमिका इथे व्यक्त झालेली आहे असे म्हणता येईल. आपण जसे कर्म करतो, त्याप्रमाणे आपल्याला त्या कर्माचे फळ भोगावे लागते. आपल्या नित्याच्या जीवनातील अनुभव बघा. आपण प्रवासाला निघतो. प्रवासाच्या मार्गात जर एखादा साखर कारखाना असेल, तर त्या परिसरातून जातांना मळीच्या वासाने आपण अस्वस्थ होतो. तेच जर सुसह्य अत्तर आपण लावले असेल तर स्वाभाविक प्रसन्न वाटते.

आपण करीत असलेल्या कर्माचेही तसेच आहे. मन लावून लक्षपूर्वक काम केले तर त्या कामात चुका होत नाहीत किंवा खूप कमी होतात. कामाच्या अचूकतेबद्दल वरिष्ठही प्रसन्न होतात. पण तेच जर कामात लक्ष नसेल तर चुकांची वाढ होते. वरिष्ठांच्या नाराजीला तोंड द्यावे लागते. 'तू चुकतोस' असं समोरच्याला म्हणतांना खरं तर आपल्या पाच बोटांपैकी एकच बोट त्याचेकडे असते. उरलेली चार बोटं आपल्याकडेच वळलेली असतात. त्यासाठीच इतरांच्या दोषांपेक्षा स्वतःचे आत्मपरिक्षण महत्त्वाचे आहे. स्वतःच्या स्वार्थासाठी आपण इतरांचे प्रसंगी वाईट व्हावे, त्यांना त्रास व्हावा असे मनात ठरवतो. पण हेच वाईट चिंतन आपल्यासाठी दुःख निर्माण करीत असते. मनाने दुसऱ्याचे वाईट चिंतण्याचे आपले कर्म, वातावरणात वाईट विचार प्रक्षेपित करतात. त्यामुळेच त्या वाईटाचा त्रास आपल्याला होतो. जीवनातील आपले प्रत्येक कर्म इतरांना आनंद देणारे असावे. प्रसन्नता देणारे असावे. त्यामुळे आपणही आनंदी होतो. म्हणूनच वडिलधारी मंडळी म्हणतात – 'घेता आले तर कुणाचेही आशिर्वाद घ्या. कुणाचेही शिव्याशाप घेऊ नका.'

**लक्ष्मीकांत जोशी, नाशिक**
मोबा. ९९७०९३०२७६



कै. दि.वा.
१८८५–१९६६



कै. भा. दि.
१९१३–१९६८



कै. अ. भा.
१९४४–२०१५

**३ पिढ्यांच्या अथक परिश्रमानंतर**
**१०० व्या वर्षात पदार्पण**

# मे. डी. व्ही. भाटवडेकर

## क्लॉथ मर्चंट्स

**६४०, नारायण पेठ, न. चिं. केळकर रस्ता, नू.म.वि. मराठी शाळेसमोर, पुणे ४११०३०.**
**email : dwb10051917@gmail.com, फोन नं. : २४४५६०४७, मोबा. : ९८५०९७९७०६**

**सकाळी १० ते १ दुपारी ४.३० ते ८.३०. सोमवार बंद**


।। श्री गजानन प्रसन्न ।।
।। श्री गुरुदेव दत्त ।।

।। श्री ।।

।। श्री आर्यादुर्गा प्रसन्न ।।
।। श्री रामेश्वर प्रसन्न ।।



## ‘श्री दत्तयाग’ निमंत्रण

श्री आर्यादुर्गा व श्री रामेश्वर यांच्या कृपेने आणि आई-बाबांच्या प्रेरणेने मनातील सुप्त इच्छा शनिवार आणि रविवार, दि. २७ व २८ ऑगस्ट २०१६ रोजी आयोजित **‘श्री दत्तयाग’** रूपात पूर्ण होत आहे. आमच्या जीवनातील या आनंदाच्या क्षणी आपल्यासारख्या सुहृदांनी, हितचिंतकांनी, सहकाऱ्यांनी तीर्थप्रसादास अगत्यपूर्वक येण्याचे करावे आणि आमचा आनंद द्विगुणित करावा, ही विनंती.

*** वेळ ***

**शनिवार, २७ ऑगस्ट २०१६**

| | |
|---|---|
| सकाळी ७ ते १२ | पुण्याहवाचन, देवता स्थापना, जप |
| संध्या. ५ ते रात्री ९ | भजन, आरती, मंत्रपुष्प |

**रविवार, २८ ऑगस्ट २०१६**

| | |
|---|---|
| सकाळी ७ ते १२ | अभिषेक, जप, पूर्णाहुती |
| संध्या. ५ ते रात्री ९ | भजन, दर्शन आणि प्रसाद |

**श्री दत्तयागाचे ठिकाण :** कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळाचा **‘समाजमंदिर (ए.सी.) हॉल’**, टिळकनगर, डोंबिवली (पूर्व)

आपले,
सौ. शिल्पा राजेंद्र कामतेकर सौ. राजेंद्र विष्णु कामतेकर
चिन्मय राजेंद्र कामतेकर


**लग्न, मुंज वगैरे लहान-मोठ्या समारंभांसाठी सर्व सोईंनी युक्त कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळाचा ‘समाजमंदिर (ए.सी.) हॉल’** टिळकनगर, डोंबिवली (पूर्व).

**अधिकृत केटरर्स**
**चिन्मय केटरर्स – ९८२०९२४४०६ / २४४५५१०**

# रौप्यमहोत्सव कार्यक्रम

## भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचा रौप्यमहोत्सव

भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचा रौप्यमहोत्सव कार्यक्रम रविवार, दि. १० एप्रिल २०१६ रोजी 'संकल्प' मंगल कार्यालय, पुणे येथे झाला. हा कार्यक्रम यशस्वीरीत्या साजरा होण्याचे कारण म्हणजे महासंघाच्या सदस्य संघांनी व कार्यकर्त्यांनी केलेली अपार मेहनत आणि कऱ्हाडे ज्ञातिबांधवांनी व विविध शहरांमधील जाहिरातदारांनी केलेले अमूल्य सहकार्य हेच म्हणता येईल.

दि. ४ व ५ जुलै २०१५ रोजी पुण्यात महासंघाची वार्षिक सभा फडके हॉल येथे घेण्यात आली. त्यामध्ये महासंघास २५ वर्षे आणि संपर्क त्रैमासिकास ११ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल मोठा कार्यक्रम करावा, ही संकल्पना पुणे संघाचे अध्यक्ष श्री. गणेश गुर्जर आणि महासंघाचे सचिव श्री. गोपाळ भाटवडेकर यांनी सर्व सदस्य संघांना मार्च २०१५ मध्ये कळवून त्यांची मते मागवली होती. त्याचाच आधार घेऊन हा विषय चर्चेस घेतला आणि उपस्थित सर्व संघांनी त्यास पसंती देत संपूर्ण सहकार्याची तयारी दर्शविली. त्यामुळे त्याच दिवशी रौप्यमहोत्सव समिती नेमण्यात येऊन त्या समितीनेच सर्व कार्यक्रम यशस्वी करावा, असे ठरविण्यांत आले. या समितीच्या वेगवेगळ्या उपसमित्या नेमण्यात येऊन त्यांच्यावर कार्यक्रमाची जबाबदारी देण्यात आली. या सर्व समित्यांच्या सदस्यांनी, तसेच उत्साही कार्यकर्त्यांनी त्यास उत्तम प्रतिसाद दिला. त्यामुळेच कार्यक्रम संपन्न होऊ शकला. सर्व समित्यांची शेवटची सभा दि. २७ मार्च २०१६ रोजी पुण्यात 'स्वस्तिश्री' सभागृहात पार पडली. त्या वेळी संपूर्ण कार्यक्रमाची रूपरेषा, स्मरणिकेची तयारी आणि अन्य माहिती– जसे की, आपल्या ज्ञातीमधील मान्यवर कोण येणार, त्यांचा सत्कार कोण करणार, स्टेजवर कोणाकोणास आमंत्रित करायचे याची सर्व माहिती– संयोजक श्री. गणेश गुर्जर यांनी सांगितली. ज्या मान्यवरांचा सत्कार करायचा, त्यांना कशा प्रकारे सन्मानित करायचे याचीही माहिती श्री. गणेश गुर्जर यांनी दिली. रौप्यमहोत्सवात उपस्थितांचे स्वागत ज्या स्वागतगीताने करायचे, ते गीत डॉ. सौ. राजश्री महाजनी यांनी स्वतः लिहिले. संगीत आणि स्वरबद्ध केलेले हे गीत गाऊन सर्व उपस्थितांना दाखवले, इथेच कार्यक्रमाच्या यशस्वितेची नांदी झाली. तसेच सौ. विनया देसाई या सुविख्यात निवेदिका यांनी आपल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करण्यास संमती दिली आणि कार्यक्रम अत्यंत सुंदर पद्धतीने आणि उत्तम होईल अशा शुभेच्छाही दिल्या.

अखेर रविवार, दि. १० एप्रिल २०१६ चा दिवस उजाडला. 'संकल्प' हॉलमध्ये आदल्या रात्रीपासून कार्यकर्ते व्यवस्था करत होते आणि तो कसा होणार याची प्रतीक्षा सुरू होती. रविवारी सकाळी ९.३० पासून मान्यवरांची तसेच ज्ञातिबांधवांची सभागृही येण्यास सुरुवात झाली. सर्वप्रथम सर्वांचे आदराने स्वागत करून नाश्ता व चहा–कॉफी घेऊन स्थानापन्न होण्याची विनंती सर्वांना करण्यात आली. १० वाजून ३० मिनिटांनी कार्यक्रमास सुरुवात झाली. मान्यवर सत्कारमूर्तींसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली होती. सूत्रसंचालिका सौ. विनया देसाईंबरोबर नागपूरहून प्रभाताई देऊस्कर उपस्थित होत्या. सर्वांचे स्वागत झाल्यावर स्टेजवरील मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि गणेशपूजन करण्यात आले. नंतर डॉ. सौ. राजश्री महाजनी यांनी स्वररचित, स्वरबद्ध केलेले स्वागतगीत म्हटले आणि उपस्थित मान्यवर, सत्कारमूर्ती यांनी टाळ्यांचा गजर करून त्यांचे कौतुक केले. श्री. गोपाळ भाटवडेकर यांनी संस्थेच्या सुरुवातीपासून पंचवीस वर्षांच्या कार्यांचा आढावा आपल्या प्रास्ताविकात घेतला. यानंतर मुख्य कार्यक्रमास सुरुवात झाली. महासंघाचे अध्यक्ष श्री. आनंद पराडकर यांनी मा. श्री. गुरू बालाजी तांबे यांचा श्रीफळ, शाल, पुष्पगुच्छ, सन्मानपत्र आणि स्मृतिचिन्ह देऊन गौरव केला.

त्यानंतर मा. श्री. सु. ग. शेवडे यांचा गौरव श्री. भाटवडेकर यांनी केल्यानंतर सुप्रसिद्ध अभिनेत्री सौ. इला भाटे यांचा गौरव श्री. गणेश गुर्जर यांनी केला. त्याचप्रमाणे स्टेजवरील मा. श्री. रवींद्र प्रभुदेसाई, मा. श्री. डॉ. प्र. चिं. शेजवलकर, मा. श्री. विश्राम जमादार यांचा सत्कार अनुक्रमे श्री. गुरू बालाजी तांबे आणि मा. श्री. सु. ग. शेवडे यांनी केला. यानंतर मान्यवर कऱ्हाडे ज्ञातिबांधव– ज्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात उत्तुंग कामगिरी केली– यांचा गौरव करण्यांत आला. या सर्व गौरव प्रसंगी माननीयांच्या कार्याची माहिती सौ. विनयाताई व प्रभाताई यांनी करून दिली.

भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाच्या उभारणीत सिंहाचा वाटा

असणारे तसेच 'संपर्क' या त्रैमासिकाची गतिविधी समर्थपणे पेलणारे आणि ज्यांच्या या कार्यामुळे महासंघाची यशस्वी २५ वर्षे आज आपण अनुभवत आहोत असे श्री. प्रभाकर कोनकर, श्री. सुहास भागवत, श्री. अनिल सरदेसाई, श्री. नरेश मुळ्ये, श्री. अशोक मंडपे व श्री. नरेंद्र ताटके यांना यथोचित गौरवान्वित करण्यात आले.

यानंतर श्री. गुरू डॉ. बालाजी तांबे यांनी आपल्या भाषणास सुरुवात केली. ते म्हणाले–

''आपण ह्या ठिकाणी सर्व ब्राह्मण संघ म्हणून आलेले आहोत. पण आज मला एक आनंद वाटतोय की, हे नुसतं ब्राह्मण संमेलन नसून ब्राह्मण्य संमेलन आहे. म्हणजे काय की– आपण जर सत्त्व, रजो, तम गुण घेतले तर त्यातील सत्त्व गुणाची अत्युच्च अवस्था म्हणजे अत्युच्च नीतिमत्ता जो पाळेल तो ब्राह्मण आणि मग उतरत–उतरत खाली शूद्रापर्यंत नीतिमत्तेचा हा खरा प्रश्न आहे. नीतिमत्ता ही ज्ञानाशिवाय, श्रद्धेशिवाय शक्य नसते आणि एवढी मोठी कार्ये केलेल्या ३३ जणांचा जो सत्कार केला, तो खरोखरच स्तुत्य आहे. एका शाळेच्या सत्कार समारंभाला मी गेलो असेन. तिथे अ,ब,क,ड,ई अशा १० तुकड्या असतात. प्रत्येक वर्गाच्या मुलांचा सत्कार करायचा म्हटलं तर १०० जणांना पारितोषिकं दिलेली मला आठवत असतील. त्या पारितोषिकांचं काय– नुसतं एक उत्साहवर्धक एवढं त्याचं स्वरूप असतं. परंतु ह्या ठिकाणी एक दिगंत कीर्ती... प्रत्येकाने ह्या ठिकाणी कार्य केलंय. या सत्कारार्थींनी जे कार्य केलंय ते ऐकल्यानंतर त्याच्या पाठीमागे खूप तपश्चर्या, इमानदारी आणि समाजाप्रति असणारं प्रेम ह्या तीन गोष्टी असल्याशिवाय हे एवढं मोठं कामच होऊ शकत नाही. म्हणून ह्या सर्व मंडळींना ब्राह्मण म्हणण्यापेक्षा हा ब्राह्मण्याचा सत्कार म्हणीन. मला असंही वाटतंय की, बऱ्याच वेळेला विचारलं की– तुम्ही हिंदू म्हंजे काय? तर आम्हाला काही तरी भौतिक माहिती सांगून काय उपयोग! जसं मी एकदा मोठी वास्तू म्हंजे चर्च पाहायला गेलो होतो. तर तिकडे ह्या वास्तूला किती विटा वापरल्या आणि किती माणसांनी किती दिवस काम केलं, हे जाणून घेण्यासाठी नाही; तर अशा गोष्टी की, ज्या संख्येत मोजता येत नाहीत. जो काही दशांगुळे पुरुष उरला, त्याची माहिती द्या. ह्या चर्चमध्ये असं काही झालं का की, जेणेकरून नराचा नरोत्तम झाला? कष्टी समाजासाठी त्याने असं काही करून ठेवलं का, की समाज त्यांची अनेक वर्षे आरती आणि कीर्ती गात राहिला?''

शेवटी त्यांनी उपस्थितांना विनंती केली की, आपण सर्वांनी पूर्वसूचना देऊन आत्मसंतुलन व्हिलेज, कार्ला येथे अवश्य यावे.

त्याचप्रमाणे डॉ. प्र. चि. शेजवलकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. श्री. सु. ग. शेवडे आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले,

''कऱ्हाडा हा एक वेगळाच मामला आहे, बरं का! मी खूप अभ्यास केला आहे. कारण चार ब्राह्मण सभांना मी अध्यक्ष होतो. एका जनसंघ ब्राह्मण सभेला मी नागपूरला अध्यक्ष होतो. त्यामुळे ज्ञाती ह्याचा मी खूप बारकाईने अभ्यास केलाय आणि मला सर्वत्र जाणवलं की, कऱ्हाडे ही वैशिष्ट्यपूर्ण जात आहे.

मुलुंडला कऱ्हाडे ब्राह्मण सभेला मी अध्यक्ष होतो. मी त्या संमेलनाच्या ठिकाणी येत होतो. तिथे काही मंडळी होती. त्या वेळची लोकांची विस्मरणशक्ती असते भरपूर, म्हणून हे आज पुन्हा सांगतोय. मी त्या ठिकाणी ड्राइव्ह करून गेलो आणि समोर आलो, तर एका जिन्याने वर जायचं होतं. एक वृद्ध तिथे भेटले. मला म्हणे, 'तुम्ही शेवडे का?' मी म्हटलं, 'हो.'

आजचे अध्यक्ष तुम्ही आहात?

म्हटलं, हो. का हो, असं का विचारताय?

तुम्हाला अध्यक्ष होण्याचा अधिकार काय म्हणाले.

का हो, असं काय विचारताय?

तर ते म्हणाले, मला तुमची चांगली माहिती आहे. तुमची बायको कोकणस्थ आहे. तुमच्या दोन्ही सुना देशस्थ आहेत. तुमचे जावई देशस्थ आहेत. मग कऱ्हाड्यांचा अध्यक्ष व्हायचा अधिकार काय तुम्हाला?

मी म्हटलं, तुम्ही अगदी कऱ्हाडेसारखाच प्रश्न विचारलात! म्हटलं आता मी माझ्या भाषणात ह्याचं उत्तरं देईन, पण छान विचारलं तुम्ही.

आणि जेव्हा माझ्या अध्यक्षीय भाषणाची वेळ आली, तेव्हा ते समोर बसले होते. मी त्यांच्याकडे बोटं दाखवून म्हटलं, आज आल्या–आल्या ह्या गृहस्थांनी हा प्रश्न विचारला. म्हणजे खरंच माझ्याही मनात आलं की, काय उत्तर द्यावं? त्यांनी सगळं हे पोस्टमार्टेमच केले आहे. अगदी आडदांड माहिती आहे त्यांना.''

महासंघाचे अध्यक्ष यांनी समारोपाचे भाषण करून उपस्थित महानुभाव आणि अनेक संघांचे सभासद यांना धन्यवाद देत आपल्या भाषणाचा समारोप केला.

महासंघातर्फे 'कऱ्हाडा तितुका मेळवावा' ही स्मरणिका तयार करण्यात आली. त्या स्मरणिकेचे प्रकाशन मा. सौ. इला भाटे यांच्या शुभ हस्ते झाले.

या कार्यक्रमाचे संयोजक श्री. गणेश गुर्जर यांनी उपस्थित सर्व संघांचे आजी-माजी अध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्यवाह, कार्यकारिणी सदस्य आणि संघाचे सभासद तसेच स्टेजवरील मान्यवर सत्कारमूर्ती, उपस्थित सत्कारार्थी यांचे प्रति महासंघाच्या विनंतीस मान देऊन कार्यक्रम यशस्वी केला त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाच्या सूत्रसंचालक सौ. विनयाताई, सौ. प्रभाताई, स्वागतगीत म्हणणाऱ्या डॉ. सौ. राजश्री, 'संकल्प'चे व्यवस्थापन, सर्व सहकार्य देणाऱ्या विविध संस्था, स्मरणिका उत्तम प्रकारे छापून वेळेत देणारे श्री जे प्रिंटर्स प्रा. लि. आणि सर्व उपस्थितांप्रति कृतज्ञता व्यक्त करून सर्वांना सुग्रास भोजनाचा आस्वाद घेण्याची विनंती केली.

भोजनपश्चात बहारदार संगीताच्या कार्यक्रमाने रौप्य- महोत्सवाच्या कार्यक्रमास संगीताचा साज चढविला. अनेक उत्तम गाणी सादर करत त्यांनी उपस्थितांची दाद घेतली. हा कार्यक्रम संपल्यावर चहापान आणि स्मरणिका वाटपाचा कार्यक्रम झाल्यावर रौप्यमहोत्सवाच्या कार्यक्रमाची सांगता झाली.

**गणेश गुर्जर**
संयोजक : रौप्यमहोत्सव समिती

### माझी ताई



कमलताई, कमलताई
होती सगळ्यांची ती ताई
पण माझी झाली आई ।। धृ ।।

भेदभाव कुणाचा नव्हता
द्वेष तिला माहीतच नव्हता
प्रेमाचा तो झरा होता
आनंदानेच भरला होता ।। १ ।।

इकडून यायची, तिकडून यायची
इकडे जायची, तिकडे जायची
सगळ्यांच्या कामासाठी
ती सारखीच धडपडायची ।। २ ।।

सगळ्यांची कामे व्हावी
हे तिला नेहमीच वाटायचे
परकेपणाचे भाव तिला
कधीच माहीत नसायचे ।। ३ ।।

मायेचा तो तिचा हात
पाठीवरून गेला माझ्या
आदर्श मात्र तिचा मी
सतत जीवनात ठेवीन आता ।। ४ ।।

**द्वारा : सौ. उज्ज्वला मोहन नागराज**
(जावडेकर)
(जमशेदपूर) झारखंड





**श्रीगुरूचरित्रस्थान दर्शन यात्रा**
**(६ राज्ये)**

**वैशिष्ट्ये**

**किमान ४००० कि.मी. प्रवास. किमान ३५ दर्शन स्थळे**

➢ आंतर राज्य रेल्वे व राज्यांतर्गत २ x २ बस प्रवास.
➢ रेल्वे प्रवास III Tire A/c.
➢ निवास २/३ व्यक्ती अटॅच्ड बाथरूम.

अ) गुजराथ, उत्तर प्रदेश व मध्य प्रदेश - नोव्हें. १६ (८ दिवस)
नांव नोंदणी बंद. रु. १६,०००/-

ब) महाराष्ट्र - जाने. २०१७ (५ दिवस)
नांव नोंदणी २० सप्टेंबर २०१६ पर्यंत. रु. ८,०००/-

क) कर्नाटक, आंध्र प्रदेश - साधारण नोव्हेंबर २०१७ (८ दिवस)
नांव नोंदणी चालू. रु. १६,०००/-

**रेल्वे रिझर्वेशन ४ महिने आधी म्हणून त्वरित संपर्क**

**र.श्री. ठाकूरदेसाई**
**०२०-२५३९३२९४/मो.नं. ९४२०९२७९४५/९९२२१८२४९४**

# वाटचाल सुवर्णयुगाकडे

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाने दि. १० एप्रिल २०१६ रोजी आपला रजतमहोत्सव साजरा केला. हा कार्यक्रम म्हणजे महासंघाची सुवर्णयुगाकडे चाललेल्या वाटचालीची नांदीच, असे म्हणायला हवे. या महोत्सवाच्या यशस्वितेतच त्याची चाहूल आपल्याला लागली आहे.

आता हेच पाहा ना! कार्यक्रमाचे स्थान पुण्य नगरीतील संकल्प मंगल कार्यालय. गेले सतत सात ते आठ महिने एकमेकांच्या संपर्कात राहून कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी धडपड करणाऱ्या विविध संस्थांसाठी नाशिक संघाने श्रमपरिहाराचे आयोजन केले, तेही समर्थ मंगल कार्यालयात. एका विशिष्ट ध्येयाने सर्व संघांनी एकत्र येऊन समाजोन्नतीचा संकल्प सोडून तो पूर्ण करण्यास समर्थ, असाच संदेश ह्यातून सूचित होतो.

सदर १५-२५ वर्षांच्या कालावधीतील प्रगतीचा आढावा महासंघाच्या कार्यक्रमात आपल्या प्रास्ताविकात घेतला. सुरुवातीस ८-१० संघ संपर्कात, होते ते आजमितीस जवळपास २५ झाले आहेत. धर्मादाय आयुक्त आणि सोसायटी रजिस्ट्रार येथे महासंघाचे नोंदणीकरण झाले आहे. महासंघाजवळ स्वत:चे पॅन कार्ड आहे. रौप्यमहोत्सवाच्या कार्यक्रमानंतर अशा प्रकारचे कार्यक्रम महासंघाने वारंवार करावेत, अशी अपेक्षा व्यक्त होत असून समाजामध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

महासंघ ही धर्मादाय आयुक्त ह्यांच्याकडे नोंदणीकृत संस्था झाल्यानंतर कार्यकारिणीची निवडणूक नुकतीच नाशिक येथे घेण्यात आली आणि ही निवडणूक अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात व बिनविरोध पार पडली, हे आणखी एक यश म्हणावे लागेल. शिवाय निवडून आलेले सर्व आपापल्या क्षेत्रात अनुभवाने आणि कर्तृत्वाने नावाजलेले आहेत, हे विशेष. प्रत्येकावर देण्यात आलेली कार्यकारिणीतील जबाबदारी त्यांना साजेशीच आहे. मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर, डोम्बिवली, बंगळुरू, नाशिक आणि कोल्हापूर या संघांचे प्रतिनिधी कार्यकारी मंडळावर आहेत.

त्याचबरोबर अनेक आव्हानांशी महासंघाला सामना करावा लागणार आहे. वरील संघांना एकत्रित ठेवणे, त्यांच्यात संपर्क ठेवणे, आर्थिक दृष्ट्या दुर्बल असणाऱ्या संघांना सर्वतोपरी साह्य करून त्यांना इतर सक्षम संघांच्या बरोबरीत आणणे, ज्या विभागात ज्ञातिबांधव आहेत पण संघ नाही, अशा ठिकाणी संघाची स्थापना प्रयत्नपूर्वक करणे व त्यांना आवश्यक ते मार्गदर्शन करणे; संघांमधील माहितीची देवाण-घेवाण करणे, समाजाच्या उन्नतीसाठी विविध उपक्रम राबवणे आणि हे सर्व करत असताना महासंघ आर्थिक दृष्ट्या बलवान करणे, अशी आव्हाने आहेत.

महासंघाची सध्याची सक्षम कार्यकारिणी आणि सदस्य संघांचे उत्साही कार्यकर्ते वरील आव्हाने लीलया पेलून पुढे वाटचाल करतील व समाज त्यांना वेळोवेळी उत्तम प्रतिसाद देईल, यात शंका नाही आणि त्यामुळे महासंघाचा सुवर्णमहोत्सव याहून दुप्पट उत्साहात व प्रतिसादात संपन्न होईल, असा विश्वास आज करण्यास हरकत नाही.

**सुहास भा. भागवत**
सदस्य कऱ्हाडे ब्रा. सेवा मंडळ, डोंबिवली
मो. क्र. ९८७०४२३०७१

*With Best Compliments from,*

**Reindeer Apparels**
for
jerkins and jackets

**Manini Gurjar**
1275, Shukrawar Peth,
Neha Apartments,
Subhash Nagar, L.No. 6,
Pune - 411 002
**Phone : 020-24476336, 24483225**
**Fax : 020-24454787**
E-mail : dispomed@vsnl.com


शरीराला आकार देणारा कुंभार म्हणजे व्यायाम.

# अभिप्राय



कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाने रौप्यमहोत्सव २०१६ निमित्त 'स्मरणिका' प्रकाशित करण्याचा उपक्रम प्रशंसनीय आहे. धन्यवाद!

'स्मरणिका' म्हणजे साठवण! विविध उपक्रमांचा लिखित लेखाजोखा! कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाशी संलग्न अशा सर्व क. ब्रा. संघांच्या कार्याचा हा एकत्रित आलेख आहे. यामुळे सर्व संघांना कार्याच्या बाबतीत आपण नेमके कोठे आहोत हे समजणार आहे, तसेच कार्यप्रवृत्त होण्यासाठी प्रेरणा मिळणार आहे.

'आपण कऱ्हाडे' या संदर्भातील सर्वंकष माहिती (आडनावे, गोत्र, कुलदैवते) ही स्मरणिकेची जमेची बाजू आहे.

एक उल्लेख राहिला आहे– पृष्ठ १७, कुलदैवत – योगेश्वरी (अंबेजोगाई) – कुलदैवत कालभैरव (लांजा) येथे फक्त 'खेर' उल्लेख आहे, तेथे 'हर्डीकर' उल्लेखही असणे आवश्यक आहे.

'सुप्रसिद्ध कऱ्हाडे ब्राह्मणांची नोंद' हे स्मरणिकेतील खास आकर्षण आहे.

महासंघाचे मुखपत्र 'संपर्क'ने सर्व संघांशी संवाद साधून त्यांना एकत्र बांधून ठेवले आहे. यामुळे सर्व संघांची वाटचाल दिशादर्शक ठरणार आहे.

मुखपृष्ठावरील स्वातंत्र्य सौदामिनीचे चित्र व जीवन परिचय स्मरणिकेची उंची वाढवतो.

स्मरणिका देखणी, आकर्षक, वाचनीय लेख यामुळे संग्राह्य आहे. सर्वांना मन:पूर्वक धन्यवाद. सर्व आर्थिक सहायकांचे आभार! संघाच्या भावी वाटचालीस शुभेच्छा !

**डॉ. आरेन हर्डीकर**
माजी उपाध्यक्ष, कार्यवाह
क. ब्रा. संघ, कोल्हापूर


सातारी पेढा शॉप



संस्थापक
कै. वासूदेव महादेव जावडेकर

स्थापना-१९३६



मशहूर
सातारी पेढे
काजू बर्फी
आंबा बर्फी
गुलकंद बर्फी
श्रीखंड वडी

चटकदार
फरसाण
स्पेशल चिवडा
सुकामेवा
खारा काजू
चटणी वगैरे

श्रीखंड आणि चक्का
पौष्टीक खाद्य भांडार
अभ्यंकर रोड, सीताबर्डी, नागपूर–440012, फोन : 0712–2525704

# रौप्यमहोत्सवामधील मा. श्री गुरू बालाजी तांबे यांचे भाषण

अध्यक्ष महोदय व सर्व इकडे जमलेले मान्यवर... माझ्याहून सर्व ज्ञानी आणि मोठी मंडळी इथे आहेत. आपण एक कुटुंबच जमलेलो आहोत. सर्व ज्ञानी व विचारवंत एका कुटुंबातीलच जमले आहेत. माझ्या मनात एक विचार आला की, आत्ता ताईंनी असं सांगितलं की, त्यांना यजमानांचा पुरस्कार घ्यायला हरकत नाही. कारण त्यांच्या सहकार्यानेच त्यांना हा पुरस्कार दिलाय. मी असं म्हणेन की, माझ्या पत्नीशिवाय हे कार्य झालं नसतं. त्यामुळे हे पुरस्कार त्यांच्यापर्यंत पोचायला पाहिजे, असं मला वाटतं.

मी सध्या दोन प्रोजेक्ट हातात घेतले आहेत. त्यात पर्यावरणातील खूप मोठी मंडळी आहेत. तुम्हाला एक नवा विचार सांगतो. मानवेल असं नाही, पटेल असं नाही किंवा पर्यावरणवाल्यांना त्याच्यामागे विज्ञान सापडणार नाही. परंतु, पर्यावरणाचा ऱ्हास का झाला? तर जास्त गाड्या चालवून झाला का? उष्णता नुसती वाढवताय दिवे लावून त्याच्यानं झालाय का? मुळीच नाही. पर्यावरणाचा ऱ्हास हा मानवतेच्या अधोगतीनं झालाय. आपली नीतिमत्ता सुटली मानवतेची की, काय होऊ शकतं ह्याचं पर्यावरणाच्या ऱ्हासाचं आजचं वर्णन– आज २०१६ मध्ये काय होईल ह्याचं वर्णन लिहून ठेवलंय; आपल्या पुस्तकांनी, आयुर्वेदानं लिहून ठेवलंय आणि ते वैज्ञानिक पातळीवरच लिहून ठेवलेलं आहे.

आपल्याला गाड्या कमी चालवणं खूप झेपणारं नाहीये. कारण शेवटी गाड्या विकणाऱ्याच्या गाड्या विकल्या तर गेल्या पाहिजेत. त्यामुळे आपल्याला पर्यावरणामध्ये ज्या काही असंतुलन दूर करण्याच्या प्रचलित पद्धती आपल्याकडे दाखवलेल्या आहेत, ते करायची वेळ येणार आहे. त्या करायला लागणार आहेत. त्याचे प्रयोग करून पाहिले. त्यातला आपल्या सर्व ब्राह्मणांचा आधार– ब्राह्मण म्हटलं की यज्ञ हा शब्द तयार होतो आणि यज्ञाची पूर्ण व्याख्या केल्यामुळे आपण काही तरी नुसतं जाळत बसलो तर तो यज्ञ होणार नाही. परंतु यज्ञाने पर्यावरणावर कंट्रोल मिळवल्याची अनेक उदाहरणं आहेत पुराणामध्ये. आपण त्याचे प्रयोग करून ते करू शकतोय का? तर तो प्रयोग करण्यासाठी आम्ही एक संस्था स्थापन केली– बालाजी तांबे फाऊंडेशन. त्याच्या प्रिलिमिनरी टेस्ट केल्या, त्या फार चांगल्या आल्या आणि त्यातून रोग–परिहारार्थ यज्ञाचा किंवा धुराचा उपयोग हा अप्रतिम होतोच, असं दिसतंय. फक्त यज्ञाचं इतर जे काही असेल ते– जे त्याचं विज्ञान कळावं म्हणून सांगितलेलं भारूड ते– बाजूला ठेवून त्या यज्ञाकडून आपल्याला काही तरी फायदा मिळावा. तो कसा मिळेल?, तो मिळत होता का?, किती प्रमाणावर मिळत असेल– ह्याच्यावरती प्रयोग करायचं ठरवलंय. ह्या संस्थेचा पहिला मोठा प्रयोग म्हणून हरिद्वारला २८ तारखेला एक मोठा ऋग्वेद संहितेचा, ६–७ दिवसांचा प्रयोग ठेवला आहे. मी हे दोन प्रयोग केले असतील? कारण की, धूर आणि पाणी हे प्रत्येक धर्मानेच नव्हे तर अगदी आदिवासी– भारतातलेच नव्हे तर कुठे कुठे राहणारे की ज्यांना जग कुठे गेलंय हे माहीत नाही– त्यांना दोन गोष्टी पटलेल्या असतात. एक–धुराचा फायदा आणि दुसरा–पाण्यामध्ये शक्ती आहे हा.

आपल्याइकडे पाणी तीर्थ म्हणून वापरतो. तिथे म्हणजे पाणी असतं. प्रत्येक चर्चमध्ये एमजेच्या हातामध्ये एक वाटी ठेवून पाणी दिलेलं असतं. ह्या पाण्याला काही तरी वेगळं आहे कल्चर. पाण्याला मन असतं आणि पाण्याला सगळं कळतं. तो जर रागवला पाणी– तर आपल्या शास्त्रांनी सांगितलेलं आहे ती पाण्याची देवता आहे – वरुण. ती सर्व चमत्कारिक घटना – चमत्काराचा अर्थ काय? जे तुम्हाला आणि मला कळत नाही ते. तुम्हाला मी जर सांगू शकलो तर ती जादू म्हणायची व समजलं नाही तर चमत्कार म्हणायचा. पण सगळं असतं चमत्कारच शेवटी. तर हा जो काही पाण्याचा चमत्कार आहे, त्याच्यातून आता आपल्याला मोठी अडचण आलीये. ह्या वर्षी टेंपरेचर खूप वाढणार आहे. पाण्याचं दुर्भिक्ष असल्यामुळे खूप संकटं मानवावर आली आणि ती वाढत जाणार आहेत. त्याच्या पूर्वी जर आपण आपल्या प्राचीन शास्त्रज्ञांनी सांगितलेला असा प्रयोग म्हणजे विज्ञानाच्या भाषेत सध्याच्या मॉडर्न विज्ञानाच्या भाषेत जर आपण समजू शकलो, प्रयोग करून दाखवू शकलो; तर त्यातून काही तरी मार्ग निघेल. असे हे दोन प्रोजेक्ट की– पाण्याला मन आहे हे शोधून त्यातून पाण्यामध्ये कशी काय मेमरी जाते त्याचा अभ्यास करायचा. आणि मी सांगितलेलं तसं– मी गेली ५–७ वर्षे प्रयोग करून ह्याची पूर्वावस्था आहे ही वापरली. मला फायदा झाला. माझ्या इतर सर्व सहकाऱ्यांना फायदा झाला आणि ही बालाजी फाउंडेशन संस्था आहे, त्याच्यामध्ये प्रत्यक्ष कृती म्हणून कुठे तरी एखादा तलाव बांधून दिला किंवा तलावातला गाळ काढला किंवा वृक्ष

लावले. आम्ही स्वत: आत्तापर्यंत लावले असतील– मी लावले आहेत १०,००० झाडं एकट्यांनी– तर आम्ही सगळीकडे वृक्षसंवर्धनाचं काम करतो. तरुवै गुरुवै नम: । वृक्ष हे खरे माणसाचे गुरू आहेत आणि वृक्षाशिवाय काही नाही. पर्यावरणाचा परिणाम म्हणून वृक्ष जेव्हा पॉयझनस होतात, तेव्हा आपल्याला त्रास होतो. ह्या मी करत असलेल्या दोन गोष्टी आपल्यापर्यंत पोचवाव्यात म्हणजे तुम्ही सर्व त्यामध्ये सहकार्य देऊ शकाल. त्या निमित्ताने तुम्ही सर्व काल्यला याल व आमच्या कुटुंबाची, मंडळींची ओळख होईल. ५० वर्षांपूर्वी आमचा भाऊ दत्तक गेला होता. ५० वर्षांनंतर भेटलो तर सख्खा भाऊच. तसा आपल्या सर्वांना ओळख देऊन आपण सर्व एकच सूत्राचे आहोत. सगळ्यांनी कऱ्हाडे–म्हणजे सूत्र–या एकच सूत्रामध्ये आपण जन्म घेतलेलो आहोत. तर सर्वांनी पुन्हा एकत्र येऊन आपली संघटना, आपली ताकद आणि त्याबरोबर आपल्या ज्या परंपरा–रूढी आहेत त्या काही तरी जुनाट झाल्यात म्हणून काढून टाकण्यासारख्या नाहीयेत; तर त्या सगळ्या वैज्ञानिक पायावरती होत्या आणि त्यांचा पूर्ण लाभ घ्यावा, असं मला वाटतं. माझे मित्र सुरेशजी आज मला बऱ्याच दिवसांनी भेटले, आनंद झाला. त्यांनी हिंदू धर्माच्या ट्रेडिशन, परंपरेचं बरंच काही केलेलं आहे. ही सर्व काही मंडळी आहेत, ज्यांनी खूप काही काम केलंय आणि त्यांची प्रगती बघून आनंद झाला. दोन शब्द जास्तच बोललो आहे, तर त्याबद्दल माफी मागतो आणि ह्या ठिकाणी थांबतो. तुम्हा सर्वांना काल्यला केव्हा तरी या म्हणून आमंत्रण देतो.


# निकेत फोटोज्

**कर्वेनगर शाखा**

**सौ. नेहा सप्रे – ९८५०८८४९४५**

| | |
|---|---|
| पोर्ट फोलिओ | स्कॅनिंग |
| स्टुडिओ फोटोज् | व्ही.एच.एस. / डीव्ही कॅसेटची सीडी |
| पासपोर्ट फोटोज् | कॅमेरा रिपेअरिंग |
| रोल्स डेव्हलपिंग/प्रिंटींग | टेबल टॉप्स |
| लॅमिनेशन | इंडस्ट्रिअल फोटोग्राफी / व्हिडीओ शूटींग |
| डिजीटल मिक्सिंग फोटोज् | सर्व प्रकारच्या लहान मोठ्या कार्यक्रमांचे |
| कोलाज् | फोटो आणि व्हिडीओ शूटींग |

*** अपंग किंवा दुर्धर आजारी लोकांसाठी घरी येऊन फोटो काढण्याची सुविधा**


## महिमा आईचा



नवमास सोशिल्या नानाविध कळा,
त्याच मग आल्या फळा
आईमुळे बाळाचा जन्म झाला
बाळामुळे आईचा.........
आई म्हणते बाळाला,
बाळा होऊ कशी उतराई,
तुझ्यामुळे मी झाले आई,
ह्या जन्मीची अपूर्वाई.....
आई असते गुरू, आई कल्पतरू
सुखाचा सागरू, दयेचा आगरू
असते आई
आई मुलांना सुसंस्कारित करते,
स्वावलंबन, सद्वर्तनाशिवाय
त्यांच्याकडून तिची कसलीच अपेक्षा नसते...
आईचं रागावणं म्हणजे अळवावरचं पाणी
कधीच कटु भावना ठेवत नाही मनी
आई म्हणजे मंदिराचा उंच कळस
आई म्हणजे अंगणातील तुळस
आई म्हणजे वाळवंटात प्यावं असं थंडगार पाणी,
आई म्हणजे भजनांत गुणगुणावी अशी संतवाणी!
जगी आई सारखे कोण आहे?
जिचे जन्मांतरीचे ऋण आहे...
असे ऋण हे ज्यास व्याज नाही,
त्या ऋणाविना जीवनास साज नाही,
जिच्या यातनांना जगी तोड नाही,
आईएवढे कशालाच मोल नाही,
म्हणूनच–
स्वामी तिन्ही जगांचा आईविना भिकारी!

रचना, संकलन
**सौ. सुनीता सरपोतदार**
सौजन्य : श्री. प्रमोद ताटके

# रौप्यमहोत्सवामधील मा. श्री. सु. ग. शेवडे यांचे भाषण

व्यासपीठावरील व व्यासपीठासमोरील सर्व कऱ्हाडे बंधू-भगिनींनो... आजच्या कार्यक्रमाचा आरंभ करताना मला एक वैशिष्ट्य जाणवलं की, आयुष्यात एकही अशी सभा पाहिली नाही की जिथे अध्यक्ष नाही. आजच्या ह्या सभेचा अध्यक्ष नाही, कारण सगळे कऱ्हाडे आहेत. कऱ्हाड्यांना दुसरा अध्यक्ष चालत नाही.

पण मी तुम्हाला एक विचारतो आणि मग अध्यक्ष होण्याचा अधिकार मला आहे का नाही, हे तुम्हीच सांगा. मी तुम्हाला असं विचारतो- की सर्व ब्राह्मणांमध्ये ज्या जाती आहेत- कऱ्हाडे, कोकणस्थ, देशस्थ, यजुर्वेदी आणि देवरुखे- ह्या पाचांमध्ये श्रेष्ठ जाती कोणती?

मी आज तुम्हाला विचारतो, तुम्ही काय उत्तर द्याल? मला सांगा.

कऱ्हाडे!

आहे? आपण दुसऱ्यांना मोठं म्हणू का कधी!

तेव्हा कऱ्हाडे सर्वश्रेष्ठ.

पण कऱ्हाडे सर्वश्रेष्ठ आहेत, तर जे श्रेष्ठ असतात त्यांचं कर्तव्य काय?

कनिष्ठांना खालून वर आणतात.

म्हणून मी कोकणस्थांची मुलगी केली. देशस्थांच्या दोन मुली सुना केल्या. त्यांना वर आणलं. एक मुलगी देशस्थांकडे गेली, त्या घराण्याला वर आणलं. मग मला सांगा- माझं काय चुकलं?

सर्व लोक ऐकून खूश.

आणि मग त्या गृहस्थाकडे मी बघितलं.

तर ते म्हणाले (खुणेने), उत्तम!

असं लक्षात घ्या. पहिली गोष्ट- आपली जी जाती आहे, ती वेगळीच आहे. ही गोष्ट खरी आहे. तुम्ही बारकाईने अभ्यास केल्यावर लक्षात येईल. अगदी साधी उदाहरणं दिसतात. तुम्ही एखाद्या घरी गेलात, बाथरूममध्ये जाऊन हात-पाय धुतले. बाहेर आलात आणि टॉवेल कुठे आहे म्हणून बघायला लागलात की समजायचं- हे देशस्थाचं घर. सापडायचाच नाही तिथे तो.

पण हात धुतल्यावर तिथेच समोर तुम्हाला तो दिसला की समजायचं- हे कोकणस्थाचं घर.

बरं, तुमचा अपेक्षाभंग केला की नाही?

इतकं नीट-नेटकं असतं ते कोकणस्थांचं घर. आम्हा कऱ्हाडांचं कसं- तुम्ही हात धुतल्यानंतर टॉवेल घेऊन जो समोर येईल, तो कऱ्हाडे.

माझ्या या सांगण्याचा नक्की उपयोग होईल. आतापर्यंत नसेल, तर ह्याच्या पुढे हे जमायला हरकत नाही. तेव्हा चांगल्या सवयी लक्षात ठेवा.

आम्ही त्या वेळेला- ७००-८०० वर्षांपूर्वी देशस्थच. देशस्थ ऋग्वेदी मूळचे. त्या वेळी घाटावर राहणारे लोक. तिथून दुष्काळ बारा वर्षं झाला आणि राहणं अगदी अशक्य झालं, तेव्हा ह्या देशस्थांची अनेक कुटुंबं ती कोकणाकडे खाली उतरली. निरनिराळ्या बाजूंनी घाटावरून खाली आली- गोव्यापर्यंत आणि इकडे चिपळूणपर्यंत- अशी वेगवेगळ्या भागांतून उतरली. उतरल्यानंतर अशी थोडीशी जमीन द्या, थोडीशी आम्हाला जागा द्या- असं म्हटलं.

पण चित्पावनांनी सांगितलं, काही मिळणार नाही. आम्ही वर्षभर मरतो तेव्हा चार महिन्याचं पिकतंय आणि त्यात तुम्ही आणखी कुठे येणार!

आता आली पंचाईत! वरून तर आलो खाली, पण जागा नाही. हा इतिहास सांगतोय, गंमत नाही. वर तिथून आलेत आपण बघा. सर्व गावं कोकणस्थांची आहेत, ती डोंगर पायथ्याशी गावं आहेत.

त्यात पुन्हा वैशिष्ट्य बघा कऱ्हाड्यांच्या घराचं की, सगळ्यांच्या घराला पाणी जवळ आहे. सगळ्यांच्या घराला पाणी सोईस्कर पाहून कऱ्हाड्यांनी घरं घेतली, कारण कऱ्हाड्यांना आपल्या बायकांची काळजी.

कोकणस्थांच्या बायका कुठून कुठून पाणी आणतात. कऱ्हाड्यांच्या बायकांना स्वयंपाक- घराजवळ पाणी- अशी घरं आहेत सगळी.

कारण कऱ्हाडा प्रामुख्याने स्त्रीची काळजी घेणारा. कारण ती पुढे घरात राहते आणि हा बाहेर जातो सारखा. पण कोकणस्थांनी काय विचार केला की, तो पुरुषप्रधान समाज आहे. आपल्याला रस्ता सोईचा पाहिजे. कोकणस्थांची घरं रस्त्याच्या जवळ पाहा. कुठल्याही गांवी जायचं भिक्षुकीला- तर पट्कन निघाले, तिथे गेले. त्या दृष्टीने सोईस्कर.

परंतु आपल्याला सांगतो की, देशस्थ यजुर्वेदी आहेत ना, त्यांचे एक वैशिष्ट्य पाहायला मिळेल की- ज्यांच्याकडे बायका ह्या प्रमुख आहेत, ह्यांच्यात स्त्रीचं वर्चस्व आहे. ह्यांना (पुरुषांना) काही कळत नाही, असं बायको सहज बोलते आणि नवरा मान डोलवतो.

मी इतका बोलतो नं तरी यजुर्वेदी मला प्रवचनाला बोलवतात. ह्यांच्या उलट देशस्थ ऋग्वेदीमध्ये बाईला फारसं महत्त्व नाही. पुरुषाला जास्त महत्त्व आहे असं स्वतःला समजणारा. देवरुखेंमध्ये तर आणखीनच गंमत आहे. देवरुखेंमध्ये तर स्त्रीप्रधानता इतकी आहे की, घरातही काहीही गोष्ट स्त्रीला विचारल्याशिवाय होत नाही. पुरुषांच्या मनात आलं की, शेवड्यांना उद्या बोलवतोय जेवायला. काही गरज नाही– असं आतून म्हटलं, तर ह्याची प्राज्ञा नाही. आणि शेवड्यांना बोलवतोय जेवायला, हे बायकोला कऱ्हाडा विचारणारही नाही. आणि बायकोसुद्धा म्हणते, 'छान केलंत हो!' इतका समाज चांगला, विचारवंत, सुशिक्षित, सुसंस्कृत, एकमेकांना सांभाळून घेणारा असा जगात कुठे मिळणार नाही. किंबहुना, आता आपण ज्यांचे सत्कार केले, ते निवडक लोक आहेत कऱ्हाड्यांतले. त्यांच्या वतीने मी एकच सांगतो की– सबंध राष्ट्र सांभाळायची वेळ आली, तर एकट्या कऱ्हाड्यांची जात पुरेशी आहे.

अहो, शेकडो ऑपरेशन केलेले डॉक्टर आपल्याकडे आहेत. शेकडो–हजारो प्रवचन केलेले शेवडे येथे आहेत.

मगाशी माझा परिचय करून देताना दोन शब्द सांगितले गेले नाहीत, त्याची कुठे तरी मला रुखरुख राहिली आहे. पण अमेरिकेत साडेपाचशे व्याख्यानं मी केलेली आहेत. गेल्या वर्षी लंडनच्या ब्रिटिश पार्लमेंट हाऊसमध्ये चर्चिल हॉलमध्ये शिवाजीमहाराजांचं इंग्लिश चरित्र माझ्या हस्ते प्रकाशित झालं. आमच्या मीडियानं ह्याची बातमी दिली नाही.


शिवचरित्र लंडनमध्ये, पार्लमेंट हाऊसमध्ये प्रकाशित होणं– ही देशाला किती अभिमानास्पद गोष्ट आहे! ह्याची दोन ओळींची बातमीदेखील दिली नाही.

ह्याचं कारण आपला मीडिया विकला गेलेला आहे. हिंदुस्तानाच्या विरुद्ध आहे. देशाच्या विरुद्ध आहे. कीर्तन–प्रवचनाची बातमी देत नाहीत. अनाउन्समेंट देत नाहीत. किंबहुना, आजच्या सत्कारमूर्तींच्या यादीत शेवडेंचं नाव छापलेलं नाही. बघा तुम्ही. काय शेवडेंनी घोडं मारलंय, हे मला कळत नाही. प्रवचन देणारा, त्यांचं नाव नको? तेव्हा मला ह्या गोष्टीचं खूप वैषम्य वाटतं. पण एक लक्षात घ्या. आम्ही कऱ्हाडे आहोत. आमच्यामध्ये वीर शौर्याच्या परंपरेत झाशीची राणी आहे. अध्यात्माच्या क्षेत्रात अत्यंत पराकोटीला पोचलेले श्री वासुदेवानंद सरस्वती टेंबेस्वामी आमच्याकडे झालेले आहेत. दुसरे शंकराचार्य म्हणावे अशी त्यांची योग्यता होती. वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये अत्यंत टॉपची माणसं कोणताही भेदभाव मनात न आणता शोधायची ठरवलं, तर ती कऱ्हाड्यांतच आपल्याला सापडतील, अशी मला शंभर टक्के खात्री आहे.

एकच गोष्ट आणखीन सांगतो. मी १९६५ मध्ये एक पुस्तक लिहिलं. छोटं पुस्तक आहे. २० पानांचं. पुस्तकाचं नाव आहे– 'चित्रगुप्त–एक शास्त्रीय सिद्धांत'. मनुष्याचा पाप–पुण्याचा हिशोब ठेवणारा चित्रगुप्त हा काही फाईली–बियली ठेवत नाही. पण चित्रगुप्त नावाचा कोणी देव नाही. अशी कोणती देवता नाही. कुठली फाईल ठेवत नाही. त्याला कुठलं रेकॉर्ड नाही. किंबहुना, धर्म म्हणजेच एक विधिव्यवस्था आहे, तसा हा चित्रगुप्त ही एक विधिव्यवस्था आहे.

तुम्ही जो आचार, विचार आणि उच्चार करता, त्याचं गुप्त चित्रण आकाशातून चालू आहे. मी त्यात उदाहरण दिलं की– शब्द आकाशातून जातो, ते वेदांतात आहे. पण शब्दांचे माध्यम आकाश आहे, हे विज्ञानाला ९०वं वर्ष उजाडलं तेव्हा कळलं. त्यापूर्वी साऊंड हवेतून जातो, असं समजत होतो. पण तो आकाशातून जातो, हे आम्हाला कळलं. चित्रही आकाशातून जातं, हे टी.व्ही. मुळे कळलं. आम्ही केलेली पाप–पुण्य म्हणजे आचार–विचार आणि उच्चार ह्यांचं गुप्त चित्रण हे आकाशात आहे. आणि जीव जेव्हा ह्या देहातून निघतो, तेव्हा ती कर्म जीव धरून ठेवतो. बँकेत जसे तुमचे पैसे तुमच्या अकाऊंट नंबरमध्ये भरले जातात, तशी तुमची कर्म तुम्हाला लागतात आणि दहा दिवसांनी त्याचं कॅलक्युलेशन पूर्ण होतं. त्याला गती मिळते का नाही, हे दहाव्या दिवशी नक्की होतं आणि तुम्हाला कावळा दाखवू शकतो. एक यःकश्चित कावळा की, ह्याला गती मिळाली की नाही याचा संकेत देतो आणि आमचे शहाणे लोक म्हणायला लागले, ''अरे, कावळा काय–भात खायला येतो!'' पण मग काही वेळा का खात नाही? जवळ येतो, बघतो इकडे–तिकडे, पुन्हा मागे सरकतो. काय कारण आहे? जेव्हा आम्ही विज्ञानाच्या गप्पा मारतो, तेव्हा ज्ञानावर आधारलेला सनातन धर्म आहे. विज्ञान म्हणजे विपरीत ज्ञान. यथार्थ ज्ञान प्राप्त होईपर्यंत जे अज्ञात ज्ञान वाटतं ते विज्ञान. विज्ञान जेव्हा यथार्थ बोध करते, त्याला ज्ञान म्हणतात. आणि जेव्हा हे काय आहे कोणास ठाऊक म्हणतात, तेव्हा त्याला अज्ञान म्हणतात. आज हे एवढं सांगितलं. यापुढे पुन्हा केव्हा बोलवलं तर पुढचं सांगेन.


सुगंधित, तेजोमय वातावरण,
आनंददायी करी देवपूजन!
पितांबरी®
ॲग्रिकेअर डिविजन
देवभक्ती®
अगरबत्ती
चाफा
लव्हेंडर
मोगरा
केवडा
गुलाब
चंदन
Made With NATURAL Extract From Pitambari Dapoli Farms
२२ ग्रॅम
Pitambari Products Pvt. Ltd.
Thane: 022-6703 5555, CRM: 022-6703 5564, 5699, Pune: (020) 2539 0734,
7718804636,Toll free No.: 180030701044. CIN: U24239MH1989PTC051314.
NSM: 9892847421, Vidarbha: 8828200249, Khandesh: 8451907139
www.pitambari.com


FAVOLOSA
Site Address - FAVOLOSA Sno 31 Balewadi Behind
Mitcon Opposite Balewadi Stadium, Pune
abhilasha
DEVELOPERS
Office Address - Ramkripa Apartments 759/17
Ramkripa Apartments Deccan Gymkhana
Champion Sports Lane Pune 411004
Contact nos - 91-20- 25652015/16


Shrirang
Enjoy Colourfilled life @ Shrirang
Situated right opposite the Hill Behind VED Bhavan in Kothrud
Site Address - Plot number 100 Bhusari Colony Behind Ved Bhavan,S no 78/19 Pune 411038.
2 bhk and 3 bhk luxurious flats available
Office Address - Ramkripa Apartments 759/17 Ramkripa Apartments
Deccan Gymkhana Champion Sports Lane Pune 411004 Contact nos - 91-20- 25652015/16
abhilasha
CONSTRUCTION

## आरामात मांडी घालून बसण्यासाठी!

### सप्रे योगा सीट

**सुखदायक बैठक योगा सीट ₹1800/-**



- भारतीय बैठकीत आरामात मांडी घालून बसण्यासाठी
- गायक, वादक व रसिक श्रोत्यांना भारतीय बैठकीसाठी.
- पौराहित्य करणाऱ्यांसाठी
- पोथीचे पारायण किंवा जास्त वेळ एका जागी
- मांडी घालून बसून वाचन करणाऱ्यांसाठी.
- मेडीटेशनसाठी
- फोल्ड करता येणारे
- वजनाला हलके

## तुमचा हक्काचा पाठीराखा!

### सप्रे बॅकगार्ड

Curved Back Guard ₹ **3290**

Curved Magnetic Back Guard ₹ **4150**



पाठदुखीच्या त्रासातून मुक्तीसाठी हमखास उपाय. रोज ऑफिसमध्ये खुर्चीवर बसून काम करण्याने कित्येगदा पाठदुखीचा त्रास संभवतो. दरोरोज काम करताना बॅकगार्ड वापरल्यास हा त्रास होणार नाही.

- जास्तवेळ चारचाकी वाहन चालवणाऱ्यांसाठी.
- खूप वेळ खुर्चीत बसून काम करणाऱ्यांसाठी
- कुठल्याही खुर्चीवर ठेवता येते.
- फोल्ड करता येणारे
- वजनाला हलके
- पाठीच्या मणक्याच्या त्रासापासून मुक्ती.

## सप्रे बोर्डस्

पहिला मजला, चित्रशाळा भवन, भानुविलास चौक,
विजय टॉकिजच्या अलिकडे, लक्ष्मी रोड, पुणे 30.
फोन : 020 - 2445 9149, 93710 15193, 93728 50944
वेळ : सकाळी 10.30 ते 2 दुपारी 4.30 ते 8
www.saprepune.com
परगावच्या ग्राहकांनी कुरियरचे ₹ **350/-** जास्तीचे पाठवावे.

* वरील किंमती ६ महिन्याकरिता वैध

## व्यक्ति परिचय

# पंडित जितेंद्र अभिषेकी



**पंडित जितेंद्र अभिषेकी**

जन्म : २१ सप्टेंबर १९३२

जन्मस्थान : भारत

मृत्यू : ७ नोव्हेंबर १९९८

मृत्युस्थान : पुणे, महाराष्ट्र, भारत

मृत्यूचे कारण : वृद्धापकाळ

**व्यक्तिगत माहिती**

धर्म : हिंदू

नागरिकत्व : भारतीय

देश : भारत

भाषा : मराठी

**पारिवारिक माहिती**

अपत्य: शौनक अभिषेकी

**संगीत साधना**

गुरू: पं. जगन्नाथबुवा पुरोहित,

गायन प्रकार: हिंदुस्तानी शास्त्रीय संगीत,

भजन, अभंग, संगीत कारकीर्द

पेशा : गायकी

**जितेंद्र अभिषेकी**

(२१ सप्टेंबर १९३२ – ७ नोव्हेंबर १९९८) एक प्रतिभावान हिंदुस्तानी शास्त्रीय संगीतकार व गायक होते.

गोव्यातल्या मंगेशीच्या देवळात शंकराच्या पिंडीवर अभिषेक करणाऱ्या नवाथे यांच्या अभिषेकी घराण्यात त्यांचा जन्म झाला. कीर्तनकार असलेल्या वडिलांकडे संगीताचे प्राथमिक शिक्षण झाल्यावर पुढे त्यांनी पं. जगन्नाथबुवा पुरोहित यांच्याकडे संगीताचे रीतसर धडे घ्यायला सुरुवात केली. संगीताच्या शिक्षणासाठी त्यांनी गोवा सोडले आणि ते पुण्याला आले. पुण्यात अनाथाश्रमात राहून, वारावर जेवून, मधुकरी मागून ते शिकले. त्यांनी एकूण २१ गुरू केले व प्रत्येक गुरूकडून नेमकं तेवढंच घेतलं. ते सारे संस्कार आत्मसात करून आपली स्वतंत्र गायनशैली निर्माण केली.

संगीताची आराधना करत असताना त्यांनी त्यांच्या शालेय अथवा महाविद्यालयीन शिक्षणाकडे दुर्लक्ष केले नाही. ते संस्कृतचे पदवीधर होते. त्यांचे वाचन अफाट होते. संस्कृतपासून ते उर्दू शेरो–शायरीपर्यंतचे किती तरी साहित्य त्यांना मुखोद्गत होते.

सुस्पष्ट उच्चार, लयकारी व सरगम यांनी नटलेली ख्यालगायकी आणि विशेष कटाक्ष ठेवून मांडलेल्या बंदिशी हे त्यांच्या गायनाचं मर्म होतं.

अभिषेकींनी मराठी रंगभूमीसाठी खूप मोठं योगदान दिलेले आहे. विद्याधर गोखल्यांच्या नंतरच्या काळात मराठी रंगभूमीला आलेली मरगळ दूर करून रंगभूमी पुन्हा टवटवीत झाली, ती १९६४ मध्ये आलेल्या वसंत कानेटकर लिखित आणि गोवा हिंदू असोसिएशन निर्मित 'संगीत मत्स्यगंधा' या नाटकामुळे. या नाटकातल्या पदांचं संगीत अभिषेकींचं होतं. त्यांनी एकूण १७ नाटकांना संगीत दिलं. गोवा कला अकादमीच्या जडण–घडणीत त्यांचा सिंहाचा वाटा होता.

प्रयोगशीलता हा त्यांच्या संगीत–दिग्दर्शनातला महत्त्वाचा गुणधर्म. त्यांनी त्यांच्या संगीत–दिग्दर्शनात केलेले प्रयोग लोकांनाही खूप आवडले. उदा. मैलाचा दगड ठरलेल्या 'कट्यार काळजात घुसली' या नाटकाची सुरुवात त्यांनी भैरवीने केली होती. तर १९६६ मध्ये रंगभूमीवर आलेल्या 'लेकुरे उदंड झाली' या नाटकात मुक्तछंदातल्या संवादांना आणि छंदाला प्राधान्य असलेल्या गोव्यातल्या किरिस्तावांच्या तियात्राया नाट्यप्रकारातल्या संगीताचा बाज त्यांनी वापरला. या नाटकात सगळ्यात पहिल्यांदा रेकॉर्डेड साऊंड ट्रॅक्स वापरले गेले. हे संगीत काळाच्या पुढे जाणारं होतं.

अभिषेकींनी जसं स्वत: संगीत दिलं, तसं दुसऱ्यांच्या संगीत–दिग्दर्शनातही ते गायले. आकाशवाणीसाठी केलेल्या 'बिल्हण' या संगीतिकेत पु.लं.च्या संगीत–दिग्दर्शनात ते गायले. यातली गीते मंगेश पाडगावकर यांनी लिहिलेली होती, तर 'वैशाख वणवा' या चित्रपटासाठी दत्ता डावजेकर यांनी संगीतबद्ध केलेले 'गोमू माहेरला जाते हो नाखवा' हे गीतही त्यांनी म्हटले.

आकाशवाणीवर असताना त्यांनी अनेक कोकणी गाण्यांनाही संगीत दिलं. सन १९९५ च्या नाट्य संमेलनाच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाली होती.

**सन्मान**

नाट्यदर्पण (१९७८), पद्मश्री (१९८८), संगीत नाटक अकादमी (१९८९), महाराष्ट्रगौरव पुरस्कार (१९९०), गोमंतक मराठी अकादमी पुरस्कार (१९९२), बालगंधर्व पुरस्कार (१९९५), सूरश्री केसरबाई केरकर पुरस्कार (१९९६), मा. दीनानाथ स्मृती पुरस्कार (१९९६), लता मंगेशकर पुरस्कार (१९९६), नाट्य परिषदेचा बालगंधर्व पुरस्कार (१९९७), सरस्वती पुरस्कार (कैलास मठ नाशिक)(१९९७).

**अभिषेकींनी संगीत दिलेली नाटके**

मत्स्यगंधा, ययाति-देवयानी, लेकुरे उदंड झाली, वासवदत्ता, कट्यार काळजात घुसली, मीरा मधुरा, हे बंध रेशमाचे, धाडिला राम तिने का वनी?, बिकट वाट वहिवाट, सोन्याची द्वारका, गोरा कुंभार, कांते फार तुला, देणाऱ्याचे हात हजार, महानंदा, कधीतरी कोठेतरी, अमृतमोहिनी, तू तर चाफेकळी.


**With Best Compliments**

# Dynamic Engineers

**7/2 Behind K.E.B Power Station**
**Udyambag – BELGAUM**
**590008**

**CMFRS. mechanical**
**(Railway) Jacks**

**P.M. Puranik**
**09448480607**




**व्यक्ती परिचय**

**आंतरराष्ट्रीय क्रिकेट पंच**

**''श्री पद्माकर गोपाळ पंडित''**

कऱ्हाडे व्यक्तिमत्त्व (क्रीडा क्षेत्र)

**जन्म :** अमरावती १६ डिसेंबर १९३४

**मृत्यू :** नागपूर १ जुलै २००६ (वय वर्षे ७१)

**क्रिकेटचा प्रवास :** VCA क्रिकेट चे संस्थापक सदस्य BCCI भारतीय क्रिकेट कंट्रोल बोर्ड पंच कमिटीचे अध्यक्ष (१९७९ ते १९८२) पर्यंत. मध्य भारतात पहिले व्यक्तिमत्त्व ज्यांनी BCCI च्या पंच कमिटीचे अध्यक्ष पद भूषविले. नागपुरातील पहिले आंतरराष्ट्रीय क्रिकेट पंच (अंपायर) म्हणून क्रिकेटमध्ये काम करणारे कऱ्हाडे व्यक्तिमत्त्व (पंच प्रशिक्षक म्हणून सक्रीय होते)

**ODI**

- एक दिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट मॅचेस संख्या - ९ (वर्षे १९८३ ते १९८८ पर्यंत सक्रीय).

ODI चा धावता आढावा

- १० सप्टेंबर १९८३ (1st ODI) पाकिस्तान VS भारत (लाल बहादूर स्टेडीयम हैद्राबाद)
- ७ डिसेंबर १९८३ (4th ODI) भारत VS वेस्टइंडीज (चिन्ना स्टेडीयम जमशेदपूर)
- ६ ऑक्टोबर १९८४ (5th ODI) भारत VS ऑस्ट्रेलिया (नेहरू स्टेडीयम इंदौर)
- २७ डिसेंबर १९८४ (2nd ODI) भारत VS इंग्लंड (बारवाती स्टेडीयम कोलकाता)
- ११ जानेवारी १९८७ (2nd ODI) भारत VS श्रीलंका (नेहरू स्टेडीयम गोहाटी)
- १५ जानेवारी १९८७ (4th ODI) भारत VS श्रीलंका (मोतीबाग स्टेडीयम बडोदरा) बडोदा
- ६ जानेवारी १९८८ (2nd ODI) भारत VS वेस्टइंडीज (गुजरात स्टेडीयम अहमदाबाद)
- २५ जानेवारी १९८८ (7th ODI) भारत VS वेस्टइंडीज (युनिव्हर्सिटी स्टेडियम, त्रिवेंद्रम)
- १७ डिसेंबर १९८८ (4th ODI) भारत VS न्यूझिलंड (मोतीबाग स्टेडियम, बडोदरा) (बडोदा)
- ५० हून अधिक आंतर-राज्यीय क्रिकेट टूर्नामेंट : रणजी ट्रॉफी, देवधर ट्रॉफी, सी. के. नायडू ट्रॉफी इत्यादी.)

संकलन

**माधव पद्माकर पंडित**


## संस्थावृत्त

# रणरागिणी राणी लक्ष्मीबाई स्मृतिदिन

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबईच्या वतीने शनिवार, दिनांक १८ जून रोजी रणरागिणी राणी लक्ष्मीबाई यांचा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. या निमित्ताने संघाच्या कार्यालयात राणी लक्ष्मीबाई यांच्या तैलचित्राचे अनावरण सुप्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. उमाताई तळेकर यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. समारंभाला संघाचे अध्यक्ष श्री. सुहास ढवळे तसेच कार्यकारी मंडळातील सर्व सदस्य आपल्या कुटुंबीयांसह मोठ्या संख्येने उपस्थित होते. ह.भ.प. उमाताई यांनी आपल्या प्रवचनात राणी लक्ष्मीबाई यांच्या कणखर व प्रभावी जीवनाचा इतिहास आपल्या ओघवत्या वाणीतून उपस्थितांच्या समोर प्रत्यक्ष उभा केला. संघाचे अध्यक्ष श्री. ढवळे यांनी राणी लक्ष्मीबाई यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करून राणी लक्ष्मीबाईंना संघाच्या वतीने आदरांजली वाहिली. कार्याध्यक्ष श्री. विजय अंबर्डेकर तसेच संघाचे कार्यवाह श्री. देव यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. राणी लक्ष्मीबाई यांच्या जीवनकार्याबद्दल कमिटी सदस्या अंजली धोपेश्वरकर यांनी सुरेख विवेचन केले. संघाच्या कार्यकारिणी सदस्या तसेच महिला शाखेच्या अलका डोंगरे व अमृता किर्लोस्कर यांनी समारंभाचे आयोजन यशस्वीरीत्या केले. भाग्यश्री सरपोतदार यांनी उमाताई व उपस्थितांचे आभार मानून समारंभाचा समारोप केला.

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे - वासंतिक उत्सव

शनिवार, ४ जून २०१६ रोजी आमच्या संघाचा वासंतिक कार्यक्रम श्रुती मंगल कार्यालय, डेक्कन जिमखाना, पुणे येथे संध्याकाळी ५ ते ९ ह्या वेळेत पार पडला. उपस्थित सर्व सभासदांचे वासंतिक पेयपानाने स्वागत करण्यात आले.



४ जून २०१६ वासंतिक कार्यक्रम

सुरुवातीला आमच्या संघाच्या नवनिर्वाचित कार्यकारिणीची नावे उपस्थितांना वाचून दाखविण्यात आली.

त्यानंतर आमच्या संघास रुपये ५०,०००/- ची देणगी देणारे जगप्रसिद्ध अणुशास्त्रज्ञ श्री. शंकर गोवारीकर व आतापर्यंत रु २,५०,०००/- देणगी देणारे श्री अरविंद होन्कण, तसेच ज्यांची मराठी चित्रपट महामंडळावर नुकतीच नेमणूक झाली आहे अशा निकिता मोघे ह्यांचा सत्कार करण्यात आला.

सौ. शिल्पा आठले यांचा मिश्र संगीताचा कार्यक्रम ६ वाजता सुरू झाला. कार्यक्रमाची सुरुवात त्यांनी राग भूपने केली. वेळेनुरूप राग असल्याने रंगतदार सुरुवात झाली. 'जबसे तुम संग लग रही...' ने अधिक रंगत चढली. नंतर त्यांनी राग कलावतीतील एक सुंदर तराणा म्हटला. तराणा सर्व श्रोत्यांना फारच आवडला व त्यांनी टाळ्या वाजवून उत्तम प्रतिसाद दिला. पुढच्या सावरे ऐ जयो ह्या सुप्रसिद्ध गाण्याने बहार आणली. नाथ हा माझा मोही.. (संगीत स्वयंवर, राग यमन), सोऽ हं डमरू बाजे.. (मंदारमाला, राग तोडी) ही दोन नाट्य- संगीत गाणी, नाम विठ्ठलाचे घेऊ हा अभंग, मी राधिका हे मधुकंस रागातील श्रीधर फडके ह्यांनी संगीत दिलेले गीत व शेवटी हिराना.. हा निर्गुणी अभंग म्हटला. ह्या कार्यक्रमात साथ- संगत रोहन चिंचोरे (तबला), आदिती गराडे (पेटी), संजय जोशी (ताल वाद्य), यांची होती. योगिनी जोशी यांनी कार्यक्रमाचे निवेदन केले. सौ. शिल्पा आठले ह्यांच्या पसायदानानंतर भोजनोत्तर कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यक्रमास कार्यकारी मंडळाचे सर्व सदस्य व बहुसंख्य सभासद उपस्थित होते.

# झाशीच्या राणीचा स्मृतिदिन

भारताच्या पहिल्या स्वातंत्र्ययुद्धाच्या रणांगणात ज्या-ज्या लोकांनी आपले प्राण पणाला लावले, त्यांत हिरकणीप्रमाणे सदैव चमकत राहणारी स्त्री म्हणजे रणरागिणी झाशीची राणी होय.

दि. १९ नोव्हेंबर १८३५ रोजी जन्म झालेल्या पूर्वाश्रमीच्या मनु तांबे ऊर्फ झाशी राणीने १८५७ च्या स्वातंत्र्यसमरात आपल्या अपरिमित तेजाने, पराक्रमाने संपूर्ण जगाला दिपवून टाकले. अशा या तेजस्वी, देदीप्यमान रणरागिणीला १८ जून १८५८ रोजी कप्तान ह्यु रोज व त्याच्या सैन्याशी लढताना ग्वाल्हेर येथे वीरगती प्राप्त झाली.

दि. १८ जून हा झाशीच्या राणीचा स्मृतिदिन. तो दर वर्षीप्रमाणे बालगंधर्व रंगमंदिराजवळील झाशीच्या राणीच्या पुतळ्यास (हा पुतळा कऱ्हाडे ब्राह्मण संघ पुण्याने पुणे म. न. पा. ला भेट म्हणून दिलेला आहे) हार घालून साजरा करण्यात आला.



**१८ जून २०१६ झाशी राणी स्मृतिदिन**

या वर्षीचे महत्त्व म्हणजे, आतापर्यंत पुणे महानगरपालिकेच्या दफ्तरी तत्कालीन परिस्थितीमुळे १७ जून ही झाशीच्या राणीच्या स्मृतिदिनाची तारीख होती. ती सुधारून घेण्यासाठी संघाने, विशेषतः या आधीचे अध्यक्ष श्री. गणेश गुर्जर ह्यांच्या अथक प्रयत्नाने ती १८ जून अशी पुणे महानगरपालिका दप्तरी करण्यात आली. तसेच पुण्याचे माजी महापौर श्री. दत्तात्रय धनकवडे, पुण्याचे सध्याचे महापौर श्री. प्रशांत जगताप, नगरसचिव श्री. नारायण पारखी व पुणे महानगरपालिकेचे सर्व संबधित अधिकारी व कर्मचारी ह्यांच्या उत्तम सहकार्यामुळे हे शक्य झाले.

त्यामुळे या वर्षी १८ जूनला महापौर श्री. प्रशांत जगताप, उपमहापौर श्री. मुकारी अण्णा अलगुडे, कऱ्हाडे ब्राह्मण संघ पुण्याचे अध्यक्ष श्री. लक्ष्मीकांत देसाई, कऱ्हाडे ब्राह्मण संघ पुण्याचे माजी अध्यक्ष श्री. गणेश गुर्जर, मॉडर्न शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. धागे ह्यांच्या हस्ते सकाळी बरोबर ९ वाजता बालगंधर्व रंगमंदिराजवळील झाशीच्या राणीच्या पुतळ्यास हार अर्पण करण्यात आले. त्या वेळी मॉडर्न शाळेच्या २५० विद्यार्थिनी, संघाच्या विश्वस्त मंडळाचे सर्व सभासद उपस्थित होते. तसेच राष्ट्र सेविका दलाच्या स्वयंसेविकाही बहुसंख्येने उपस्थित होत्या.

अशा रीतीने पुणे महानगरपालिका व कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे ह्यांच्या उपस्थितीत एकत्रितपणे प्रथमच हा स्मृतिदिन साजरा करण्यात आला.

# ‘वसंतोत्सव’ कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुलुंड

शनिवार, दिनांक ३० एप्रिल १६ रोजी कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुलुंड या संस्थेतर्फे चैत्रगौरीच्या वासंतिक उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे ज्येष्ठ सभासद श्री. माधवराव शेंबेकर यांनी आपल्या दिवंगत पत्नी सौ. मालती शेंबेकर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ दिलेल्या देणगीतून सदर कार्यक्रमाच्या खर्चातला बराचसा भाग उचलला जातो. कार्यक्रमाला प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी सभासदांचा उत्तम प्रतिसाद लाभला होता.

संस्थेचे अध्यक्ष श्री. प्रमोद माईणकर यांनी उपस्थितांचे स्वागत आणि प्रास्ताविक केले. नंतर मुलुंडमधील एक हौशी गायक श्री. सराफ यांच्या गाण्याचा कार्यक्रम झाला. त्यांनी गायलेल्या जुन्या हिंदी-मराठी गाण्यांनी रसिकांना मंत्रमुग्ध केलं.

या संपूर्ण कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनाची जबाबदारी कार्यकारिणी सदस्या सौ. अंजली काटदरे यांनी सुंदररीत्या पेलली. त्यांनी ओघवत्या शैलीत केलेल्या निवेदनामुळे कार्यक्रमाची रंगत वाढली. मुलुंडमधील अन्य ब्राह्मण शाखांचे पदाधिकारी कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते.

संस्थेचे कोषाध्यक्ष श्री. राजीव आठल्ये यांनी आभार प्रदर्शन केले. वसंत ऋतूमध्ये होत असलेल्या या कार्यक्रमाची सांगता आंबाडाळ आणि पन्हे याचा आस्वाद घेत झाली.

# कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ

नाशिक येथे रविवार दि ८ मे २०१६ रोजी झालेला महासंघाच्या विशेष सभेचा वृत्तांत.

दि. २७ मार्च २०१६ रोजी झालेल्या बैठकीत श्री नरेंद्र ताटके ह्यांनी सर्व कार्यकर्त्यांना श्रमपरिहारासाठी दि. ८ मे रोजी येण्याचे आमंत्रण दिले होते.

मधल्या काळात आपल्याला धर्मादाय उपायुक्त पुणे ह्यांचेकडून सोसायटी आणि ट्रस्टचे पत्रक मिळाल्यामुळे ९० दिवसात निवडणुका घेणे क्रमप्राप्त होते. त्यामुळे दि. ८ मे ची सभा ही विशेष सभा धरून निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण करावी असे ठरले होते.

सभेस नाशिक सोडून ८ संघाचे २१ प्रतिनिधी उपस्थित होते. नाशिकचे सर्व कार्यकारी मंडळ उपस्थित होते.

सुरुवातीला स्वागत, प्रतिमा पूजन, अध्यक्षांचे प्रास्ताविक असे पार पडल्यानंतर निवडणूक अधिकारी श्री. सुहास भागवत ह्यांना मंचावर पाचारण करुन निवडणूक प्रक्रिया सुरु करण्यास सांगितले.

एकूण १४ अर्ज आले होते. श्री. भागवत ह्यांनी अतिशय कुशलतेने परिस्थिती हाताळून ५ जणांना अर्ज मागे घेण्याचे आवाहन केले. त्यानुसार ५ जणांनी, आपण उमेदवारी मागे घेत असल्याचे जाहीर करून बिनविरोध निवडणुकीचा मार्ग मोकळा केला.

श्री. गणेश गुर्जर, श्री. श्रीगजानन गुर्जर, श्री. जावडेकर, श्री. खंडकर, श्री. विजय आंबर्डेकर, श्री. संजय आंबर्डेकर, श्री. सुनील खेर, श्री. रायकर आणि श्री. नागराज (अनुपस्थित) असे ९ कार्यकारिणी सदस्य म्हणून निवडले गेले. त्यानंतर श्री. भागवत ह्यांनी ह्या ९ जणांना वेगळी बैठक घेऊन पदाधिकारी निवडण्यास सांगितले. (तेवढ्या करता वेगळी सभा घेणे व्यवहार्य नव्हते)

त्यानुसार श्री. विजय आंबर्डेकर अध्यक्ष, श्री नागराज उपाध्यक्ष, श्री. गणेश गुर्जर कार्यवाह आणि श्री. संजय आंबर्डेकर कोषाध्यक्ष व श्री. श्रीगजानन गुर्जर, संपादक 'संपर्क' असे पदाधिकारी एकमताने निवडले गेले.

ह्यानंतर सर्वांनी नाशिकच्या स्वादिष्ट भोजनाचा आस्वाद घेतला.

जेवणानंतर मावळते अध्यक्ष श्री. पराडकर ह्यांनी दि. १० एप्रिल च्या कार्यक्रमासंबंधी आलेल्या २ नकारात्मक पत्रांचा उल्लेख केला. ह्यामुळे चर्चा बरीच लांबली. अखेर असल्या गोष्टींकडे दुर्लक्ष करावे असा सूर निघाला कारण ही पत्रे वैयक्तिक पातळीवर लिहिली गेली होती आणि त्या संघाच्या लेटर हेड चा वापर करण्यात आला नव्हता.

ह्यानंतर चहापान होऊन कार्यक्रम संपला.

श्री नरेंद्र ताटके ह्यांच्या नेतृत्वाखालील नाशिक संघाने सर्व व्यवस्था चोख ठेवली होती. लवकर आलेल्या प्रतिनिधींची राहण्याची देखील व्यवस्था केली होती.

**गो. भा. भाटवडेकर**

मावळत्या कार्यकारिणीतील सचिव

## पदाधिकारी निवडणूक २०१६

## कऱ्हाडे ब्राह्मण संघ पुणे

कार्यकारिणीची मुदत दि. ३१ मार्च २०१६ रोजी संपत असल्यामुळे नविन कार्यकारिणीची घटने प्रमाणे निवडणूक घेणे आवश्यक होते. त्याप्रमाणे सप्टेंबर २०१५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेबरोबर निवडणुकीची प्रक्रिया पार पडली. एकूण १७ जागा होत्या त्यासाठी फक्त ११ अर्ज आले होते. त्यामुळे सर्व निवडून आल्याचे जाहीर झाले. परंतु काही सभासदांनी आम्हाला नोटीस मिळाली नसल्याची तक्रार केल्यामुळे, विशेष सभा डिसेंबर २०१५ मध्ये बोलावण्यात आली व अधिक सभासदांना संधी देण्यात आली. त्यावेळी फक्त ३ च उमेदवार उपस्थित राहिल्याने, त्यांचीदेखील निवड झाली. अशा तऱ्हेने एकूण १४ जणांची कार्यकारिणी तयार झाली. पदाधिकारी निवडण्यासाठी दि १८ एप्रिल २०१६ रोजी कार्यकारिणीची सभा बोलावण्यात आली. त्यावेळी पुढील प्रमाणे निवड झाली.

**अध्यक्ष: श्री. लक्ष्मीकांत देसाई, उपाध्यक्ष: श्री. सुहास खानवलकर,**
**कार्यवाह: श्री. हेमंत पुराणिक आणि कोषाध्यक्ष: श्री. मकरंद फणसळकर**

**सभासद:** श्री. गोपाळ भाटवडेकर, श्री. सतीश भोपटकर, श्री. श्रीगजानन गुर्जर, श्री. नंदकुमार सप्रे, सौ. मुक्ता चांदोरकर, श्री. श्रीकांत गुर्जर, श्री. हेमंत हिर्लेकर, श्री. शंतनु गुर्जर, श्री. मुळ्ये आणि श्री. पंतवैद्य

# देव देव्हाऱ्यात नाही....



**'विशेष' मुलांच्या पालकांच्या ओंजळीत काही आनंदाचे, तणावरहित क्षण अर्पण करून त्यांना दोन-तीन तासांचा तरी निखळ आनंद उपभोगता यावा, हीच 'सलाम सेवेला' या कार्यक्रमामागची अशोक मुळे यांची कल्पना होती. या कार्यक्रमाला नामवंतांनीही आपली उपस्थिती लावून सामाजिक बांधिलकी व्यक्त केली, मात्र पालक म्हणून आम्हालाही एक वेगळी दृष्टी मिळाली....**

'देव देव्हाऱ्यात नाही, देव आहे अंतरात' या पंक्ती शब्दशः खऱ्या ठरवणारा सत्यानुभव मी अगदी अलीकडेच अनुभवला. तो सत्यानुभव एवढ्यासाठीच, कारण तुमच्या-आमच्यासारख्या एका व्यक्तीने आपली असामान्य कल्पना सत्यात आणली होती. त्या रंगकर्मीचा हा एक यशस्वी प्रयोगच होता. अन्य माणसांना- ज्यांना याबद्दल काहीच कल्पना नाही, त्यांना- हा एखाद्या कलाकाराच्या घरातील मंगल कार्याचा सोहळाच वाटला असता. पण आमच्यासारख्या पालकांसाठी तो एक आनंदसोहळाच ठरला, कायम मनाच्या कप्प्यात ठेवून द्यावा असा...

त्याची सुरुवात महिनाभरापूर्वी झाली. खरं तर माझं आयुष्यदेखील घड्याळाच्या काट्याला जोडलं गेलेलं. त्यातच शाळेतली नोकरी म्हणजे परीक्षा, निकाल; शिवाय इतर पुस्तकांची कामं, दोन्ही मुलींचे प्रोजेक्ट्स वगैरे सुरूच होती. एके दिवशी अशोक मुळेकाकांचा फोन आला. त्यांना मला एका कार्यक्रमाला बोलवायचं होतं आणि झालंच तर मदतही हवी होती... बोलता-बोलता त्यांनी एका कार्यक्रमाची रूपरेषा मला सांगितली आणि माझ्यासमोर एका वेगळ्याच दृष्टिकोनातला कार्यक्रम आकार घेऊ लागला. विशेष मुलांच्या पालकांसाठीचा हा एक आगळा-वेगळा, महत्त्वाचा, मौलिक कार्यक्रम असल्याचं लक्षात आलं. मी त्यांना सर्वातोपरी मदत करण्याचं कबूल केलं आणि कार्यक्रमाशी संबंधितांना फोन करणं सुरू केलं. मुळेकाकांनी सांगितलेल्या कार्यक्रमाचं नियोजन म्हणजेच त्या कार्यक्रमाची रूपरेषा, ठिकाण, वेळ वगैरे सगळी माहिती म्हणजे जणू तोंडी कार्यक्रमपत्रिकाच प्रत्येकाला सुपूर्द केली. अर्थातच याला प्रत्येकाचा उत्स्फूर्त प्रतिसाद होता. काकांना तो प्रतिसाद सांगितला. त्यानंतरच्या काकांच्या उत्साहाला दाद द्यावी तेवढी कमीच होती.

माझ्या 'विशेष' मुलीला २००६ मध्ये 'राष्ट्रपती पदक' मिळाल्यानंतर ते अगदी या २०१६ (८ मार्चला, महिलादिनी) दूरदर्शनचा 'प्रेरणा पुरस्कार' म्हणजे मुलीच्या हस्ते आईचा सत्कार या कालच्या कार्यक्रमापर्यंतची 'मनालीची आई' ही भूमिका मला इतर सर्व भूमिकांपेक्षा जास्त भावली. ती माझी ओळख मला थेट माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांच्यापर्यंतची घेऊन गेली होती आणि नेमकं हेच (विशेष मुलांचे पालक) मुळेकाकांच्या कार्यक्रमाचं सूत्र होतं... 'विशेष' मुलांच्या पालकांच्या ओंजळीत काही आनंदाचे क्षण अर्पण करून त्यांना दोन-तीन तासांचा तरी निखळ आनंद उपभोगता यावा, हीच त्यांची कल्पना होती. अतिशय सुंदर कल्पना होती ही. कारण आज 'विशेष' मुलांनी कितीही प्रगती केली, तरी आम्हा पालकांच्या प्रश्नांवर कायमस्वरूपी असं कुठलंच ठोस उत्तर नसतं- किंबहुना आम्ही समस्त पालक-मंडळी, अंतापर्यंत सुख आणि दुःख यांना साधण्याचाच प्रयत्न करीत असतो. मुळेकाकांनी नेमकं तेच हेरलं. चोवीस तासांच्या वेळपत्रकातील तीन तास प्रत्येक मुलाच्या माता-पित्यांनी आपल्या पिलांना बरोबर न घेता, कार्यक्रमाचा आस्वाद घ्यायचा. सारं काही विसरून जायचा प्रयत्न करायचा... हे ठरलं.

प्रत्यक्ष कार्यक्रमाचा दिवस उजाडला. दादर-माटुंगा कल्चरल सेंटरचं मिनी थिएटर पालकांनी गच्च भरलं होतं. जवळ जवळ दिडशे ते दोनशे पालकांनी या कार्यक्रमासाठी उपस्थिती लावली होती. मुख्य म्हणजे ठाण्यातील 'जागृती पालक संघटना', 'गॉड्स गिफ्ट', 'चैतन्य संस्था' यांना निमंत्रित केलं होतं. त्या संस्थेतील मुलांचे पालक तर आले होतेच, त्याशिवाय या संस्थांव्यतिरिक्त इतर विशेष मुलांचे

पालकदेखील आवर्जून आले होते. त्याचप्रमाणे या विशेष मुलांच्या शाळेच्या माजी मुख्याध्यापिकांनीही आवर्जून हजेरी लावली होती.

काकांनीदेखील साठ वर्षांपेक्षा जास्त काळ या मुलांची सेवा करणाऱ्या मुंबईच्या मुख्याध्यापिकांना बोलावून मुलांच्या पालकांच्या हस्ते त्या मुख्याध्यापिकांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार केला. तसंच 'फेलोशिप ऑफ फिजिकली हॅण्डिकॅप्ड' या संस्थेला काकांनी 'माझा पुरस्कार' प्रदान केला. त्या संस्थेच्या प्रतिनिधी म्हणून शीतला धनक यांनी तो प्रमुख अतिथी ज्येष्ठ पत्रकार विजय कुवळेकर आणि न्यायमूर्ती सत्यरंजन धर्माधिकारी यांच्या हस्ते स्वीकारला.

रंगमंचावरचा 'सलाम सेवेला' हा बॅनर प्रत्येकाचं लक्ष वेधून घेत होता. त्या रंगमंचावर सुरू झालेल्या कार्यक्रमांनी, सुंदर गाण्यांनी रसिक पालकांचे कान तृप्त केले.

माझ्या मनात मात्र वेगळेच विचार सुरू होते. आम्ही जे काही करत आहोत ते आमच्या मुलांसाठी; पण ज्यांना स्वतःचे काहीच पाश नाहीत, तरीसुद्धा आमच्यासारख्या पालकांच्या तपश्चर्येची फक्त कल्पना करून त्यांनी ही कल्पना केवळ कागदावरच न ठेवता सत्यात उतरवली होती- ज्यांनी या कार्यक्रमाचं नियोजन केलं, त्या मुळेकाकांनाही आम्हा पालकांचा सलाम! या विचारात असतानाच, रुपेरी पडद्यावरील कलाकार एक-एक करून आमच्या समोर विराजमान होत होते. प्रसाद ओक, संपदा जोगळेकर-कुलकर्णी यांनी आपल्या उत्स्फूर्त कवितांचं सादरीकरण करून आम्हा पालकांना काही काळासाठी सगळ्या विवंचना विसरायला लावून एका जागी खिळवून ठेवलं. वैभव मांगले यांनी देखील 'जय गंगे भागीरथी' नाट्यपद ऐकवलं. नव्या-जुन्या गीतांची जणू मैफलच रंगली होती. त्यातील संगीताने कान तृप्त झाले होते. मला तर घड्याळाचे काटे थांबल्यासारखंच वाटत होतं.


सदाबहार संगीताच्या कार्यक्रमानंतर आम्हा पालकांसाठी पक्वान्नांच्या (आमरस-पुरीच्या) भोजनाच्या पंक्तींची तयारी झाली होती. बुफेच्या जेवणाच्या तुलनेत भोजनपंक्ती सगळ्यांच्या मनाला भावल्या. कारण आम्हाला आग्रह करून भोजन वाढण्यासाठी स्वतःच्या व्यग्र वेळापत्रकामधून वेळ काढून न्यायमूर्ती सत्यरंजन धर्माधिकारी व मुंबईच्या जिल्हाधिकारी अश्विनी जोशीदेखील उपस्थित होत्या. त्याचबरोबर अभिनेते मकरंद अनासपुरे, संजय मोने, आदिती शारंगधर, मेधा मांजरेकर आदी कलाकार वाढण्यासाठी पुढे आले होते. याशिवाय मुक्ता बर्वे, उमेश कामत, सुकन्या कुलकर्णी-मोने, विजय केंकरे, नंदिता धुरी, प्रसाद महाडकर आणि ज्येष्ठ अभिनेत्री आशालता वाबगांवकर हेही आवर्जून आले होते. तेव्हा पुन्हा एकदा एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली की, ही माणसेदेखील आपल्यासारखीच आहेत, परंतु त्यांच्यातील अवगत कला त्यांनी विकसित करून त्यांनी स्वतःला एका विशिष्ट स्तरावर नेऊन ठेवलं आहे आणि कुठल्याही प्रकाराचा अहंभाव न ठेवता 'सलाम सेवेला' या शीर्षकाला त्यांनी वाहून घेतल्याचं जाणवत होतं. सामाजिक बांधिलकीचा एक वेगळा परिपाठ गिरवला जात होता.

मला स्वतःला या कार्यक्रमांतर्गत मकरंद अनासपुरे या दिग्गज कलाकाराशी आणि त्याहीपेक्षा त्याच्यातील समाजसेवेचं व्रत घेतलेल्या माणसाशी संवाद साधता आला. समाजातील आमची मुलं असू देत किंवा शेतकऱ्यांसारखे दुर्बल घटक असू देत- यांच्यासारखीही दिग्गज माणसं या दुर्बल घटकांची फक्त शिडी न करता, आत्मीयतेनं, तळमळीनं समाजकार्य केवळ एक बांधलिकी म्हणून करीत असतात; तेव्हाच यशाची एक-एक पायरी सर करून उत्तुंग शिखराकडे ते भरारी घेत असतात. कारण त्यांच्यापाठी शुभाशीर्वादाची साथ सदैव असते. तिथे कुठलाही किंतु नसतो, कारण त्यांच्या पाठीशी आशिर्वादरूपी ऊर्जा असते.

हा कार्यक्रम सुरू असतानाच काही पालक प्रथमच सारं काही विसरून गेले होते. दुःखांचा, तणावाचा जणू विसर पडला होता. काहींचं लक्ष मात्र घरी लागलं होतं, कारण आमच्या जीवनाचा अविभाज्य घटक असलेली आमची मुलं आज काही तासांसाठी आमच्यापासून प्रथमच दूर राहिली होती. परंतु आणखी एका सत्य परिस्थितीची प्रकर्षाने जाणीव झाली- ती म्हणजे, मुळेकाकांसह ही सगळी नामवंत मंडळी आमच्या भावनांचा विचार करून काही सुखाचे क्षण आपल्या ओंजळीत टाकू शकतात, तर या मुलांच्या कुटुंबातील इतर सदस्यांनीदेखील ही मुलं फक्त याच पालकांची जबाबदारी आहे असं न मानता, काही काळासाठी तरी आपली मानायची तयारी दर्शविली तरी मुळेकाकांचा हा 'सलाम सेवेला' कार्यक्रम शंभर टक्के सार्थकी लागेल. हा वस्तुपाठच समाजासमोर प्रेरणादायी ठरेल व पालकांना एक प्रकारचा दिलासा मिळून त्यांना त्यांच्या पुढील प्रवासासाठी एक नवी ऊर्जा प्राप्त होईल, यात शंकाच नाही!

सरते शेवटी 'अनाश्रितः कर्मफलम्, कार्यं कर्म करोति यः' या श्लोकाचं आज प्रत्यक्षात आचरण झालं होतं. घरी परतताना एक वेगळंच समाधान मनात रेंगाळत राहिलं.

## गव्हाच्या रव्याचे उप्पीट






**साहित्य :** कोबी, गाजर, फरसबी, मटार, सिमला मिरची– सर्व भाज्या मिळून दीड वाटी, रवा २ वाट्या, मोहरी, हळद, मीठ, तेल, खोबरं, कोथिंबीर, लाल मिरची, कांदा, उडीदडाळ, २ चमचे साखर, दही, आले, दोन टोमॅटो, तूप.

**कृती :** कोबी लांबट, गाजराचे छोटे चौकोनी तुकडे, फरसबी बारीक, सिमला मिरची लांबट चिरा. फोडणीत कांदा, उडीद– डाळ व मिरच्या घालून रवा भाजा. लालसर करा. रव्याच्या अडीच पट पाण्यात आले घालून उकळा. भाजलेल्या रव्यात सर्व भाज्या घालून पाणी घाला. त्यात थोडे दही घाला. चांगली वाफ आणा. वरून २ चमचे चांगले तूप घाला. टोमॅटो घाला. वरून खोबरं, कोथिंबीर घाला.

## सॅण्डविच ढोकळा



**साहित्य :** इडलीचे पीठ ३ वाट्या, मिरच्या, कोथिंबीर, आले, मीठ, लाल तिखट किंवा मिरीपूड, १ वाटी ओले खोबरे, ६–७ पालकाची पाने, तेल, मोहरी, हिंग, तीळ.

**कृती :** हिरवी चटणी करा. पीठात मीठ एकजीव करा. थाळीला तेल लावून उकळल्या पाण्यात थाळी ठेवा. थाळीत पातळ थर होईल असे पीठ ओता. १० मि. झाकण ठेवून शिजवा. थाळीवर चटणीचा थर लावा. वर परत पातळ थर होईल असे पीठ ओता. परत १५ मिनिटे झाकण ठेवून शिजवा. थाळी बाहेर काढून वर मिरीपूड किंवा लाल तिखट पसरा. फोडणी करून त्यात तीळ घालून ढोकळ्यावर पसरा.

**सौजन्यः सौ. लीना मुळ्ये, पुणे**
९८२२०५००३८

## हार्दिक अभिनंदन

डॉ. सच्चिदानंद शेवडे यांना 'व्यासरत्न पुरस्कारा'ने ठाणे येथे नुकतेच सन्मानित करण्यात आले.

डॉ. सच्चिदानंद शेवडे यांचे 'हार्दिक अभिनंदन!'

कऱ्हाडे ब्राह्मण संघ गिरगांवचे कार्यकारिणी सदस्य शरद गणपत्ये यांच्या सुविद्य पत्नी सौ. शिल्पा शरद गणपत्ये यांची सेंट्रल फिल्म सर्टिफिकेशन बोर्डच्या ॲडव्हायझरी पॅनलमध्ये केंद्र सरकारतर्फे नियुक्ती झाली.

सौ. शिल्पा शरद गणपत्ये यांचे 'हार्दिक अभिनंदन!'


**॥ रेशीम गांठी ॥ ®**

करिष्मा समोर, कोथरूड, पुणे ३८.

**माफक फी, वेबसाईट फ्री**

☎ २५४६९१५८ / ९८८११५२७४६


वेळ : सकाळी १० ते १२, सायं. ५ ते ८ बुधवारी बंद

e-mail : info@reshimgathi.com

visit : www.reshimgathi.com

**सुखी वैवाहिक जीवनासाठी समूपदेशन**

**वधू-वर नोंदणी पत्रिका, भविष्य आणि परिचय मेळावे**



## जरा हसा

### काय तरी बाई गाडी!

आगगाडी एकदम थांबली, म्हणून सगळे डोकावून पाहू लागले.

''काय झालं हो?'' एका बाईने गार्डला विचारले.

''काही नाही, एका बैलाला धडक दिली.''

''ट्रॅकवर होता का तो बैल?'' बाईनी विचारले.

''नाही, गाडीने कडेला जाऊन पाठलाग केला!'' गार्ड म्हणाला.

### बाहेर भेटतीलच

एक भांडखोर नट किर्लोस्कर कंपनी सोडून चालले होते. जाताना ते आपली पादत्राणे शोधत असताना म्हणाले, ''अरे, माझे जोडे कुठं दिसत नाहीत– कुठे गेले?''

गडकरी यांनी ते ऐकलं अन् ते म्हणाले, ''कशाला शोधाशोध करता आहात, बाहेर पडल्यानंतर लोक देतीलच.''

### माझं काय चुकलं?

''मिसेस मुलतानी, तुमच्या डोळ्याला ही जखम कसली?''

''अहो, माझा नवरा त्याच्या वाढदिवशीच तुरुंगातून सुटून आला.''

''मग?'' मी विचारले.

''मी त्याला Many Happy Returns म्हटले.''

### वा: काय डोकं आहे!

पोर्टर : रेल्वेगाड्या मागून एकमेकांवर आदळल्या म्हणजे सर्वांत जास्त नुकसान होत असेल तर ते शेवटच्या डब्याला.

म्हातारा माणूस : मग तो शेवटचा डबा काढून का नाही टाकत?

### House News

'Behind the closed Doors of Medical Laboratories' which is written in Tamil has been successfully translated by Shri Ramkrishna Bhatt of Chennai our member. "Hearty congratulations' Shri Ramkrishna Bhatt.

सौजन्य: **श्री. केशव फडणीस, पुणे**

कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या ८१ व्या वर्षानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !

**वसुधा एंटरप्रायजेस**
इंटरिअर डेकोरेटर्स
श्री. नंदकुमार सप्रे ९८८१२०८८४८

■ फर्निचर ■ प्लंबिंग ■ पेंटींग ■ फॅब्रिकेशन ■ (ग्रिल्स, सेफ्टी डोअर) ■ ॲल्युमिनिअम स्लायडिंग विंडोज ■ पार्टिशन्स ■ डोअर्स पीओपी फॉल्स सिलिंग ■ लॉफ्ट टँक ■ स्टेनलेस स्टील डासांच्या जाळ्या ■ किचन ओटा एक्स्टेंशन ■ वॉल टायलिंग ■ फ्लोरिंग ■ किचन ट्रॉलीज ■ लॉफ्ट क्लोजींग ■ संडास बाथरुम वॉटरप्रुफिंग ■ बाथरुम रिनोव्हेशन ■ सन कंट्रोल फिल्म ■ वायरिंग ■ पीव्हीसी फ्लोरिंग.

वसुधा एंटरप्रायजेस म्हणजे...
... सर्व सेवा एकाच छताखाली

**फणसळकर**
**कोंकण काजू**



कोकण काजू सांडगी मिरची
फणस-तळलेले गरे काजूकतली
उत्पादक :
प्रा. सौ. मृणालिनी विजय फणसळकर
मु. पो. – आंगले, ता. राजापूर, जि. रत्नागिरी
फोन. : ९४२२२९६५५३, ०२३५३-६५६२५१

VIJAY DIWAKAR DHAVLE
MFA

CONCEPT PRINTS
THE DESIGN STUDIO

AN AESTHETIC ESSENCE TO ADVERTISING

DOMINATION IN
- Pharmaceutical Product Promotional Printed Material, Visual-Aid, Literature, Folder, Brochure
- Packaging
- Conference Printed Material
- Publication

Cell : +91 9225219040 / 9225212384 / 9225852594
Email : vdhavle@rediffmail.com

Tilak Statue, Mahal, Nagpur - 440032

Plot 118, New Dnyaneshwar Nagar,Manewada Road, Nagpur - 440027

सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा!

निलदिप केटरर्स

सौ. प्रज्ञा प्रकाश काणे
**दूरध्वनी : ०२५१-२४५२०५२**
**भ्रमणध्वनी : ९८१९३१२५६९**

शिवप्रतिमा मित्रमंडळ हॉल
डॉ. कामत हॉस्पिटल शेजारी, ममता हॉस्पिटलजवळ, निवासी विभाग, एम. आय. डी. सी., डोंबिवली (पू.)

nakhye
UDYOG
AT YOUR SERVICE

NAKHYE'S
ASHOK
SWEETS
ALL TYPES OF MITHAI, BENGALI SWEETS, FARSAN, SNACKS, DRY FRUITS.
M/S. NAKHYE FOODS LLP. Tel - +91251 2482106, +91251 2483476.
•SHOP NO.1: Everest House, Pandit Deendayal Rd. Dombivli (W)-421202. Mo. - 97026 55000.
•SHOP NO.2: Everest Shopping Center, Phadke Rd, Dombivli (E)-421201. Tel - +91251 2433193. Mo. - 9702811122.

Shubhmangal
CATERERS & AC HALL
Everest Shopping Center, Lokmanya Tilak Chowk,
Near Railway St., Dombivli (E) - 421201.
Tel: (Hall) 0251 - 2860720, 9702666000, Fax: 2483351.
Email: ynakhye@gmail.com
Website: www.shubhamangalhall.com

EVEREST
HALL
AN AIR CONDITIONED HALL
FOR ALL PROGRAMMES
WITH INDOOR CATERING FACILITY
AND ALL OTHER SERVICES
M. Gandhi Road, Dombivli (west).
Tel.: 9702622000, 9702011131

EVEREST
DISTRIBUTORS
DISTRIBUTORS FOR
Kwality Walls (HUL), Idea Cellular, Tropicana (Pepsico),
Chitale Bandhu Mithaiwale, Mother Dairy
Everest House, Pandit Deendayal Road,
Dombivli (W) - 421202. Maharashtra, India.
Tel: +91 251- 2483476, 2482106.
Fax: +91 251- 2483351 Email: anakhye@gmail.com

finVantage
EQUITY: Derivatives Commodities, DP, IPO,
Mutual Fund, Realty, Life and General Insurance,
PMS and Financial Planning Advisory
M/s. Finvantage Services(P) Ltd.
2nd Floor, Everst House, M. G. Road,
Dombivili (W)-421202. Tel.: 91251 2480305

## With Best Compliments from

# PRAKASH HOME INDUSTRIES

PHI SINCE 1960

**An ISO 9001 : 2008 Certified Company**

PHI the manufacturers of small machine tools, started its activity in small workshop in the year 1960 in Belgaum City. Initially it started producing Hand Operated Punching Machines, Hand Presses and Sheet metal components. In the year 1976 it shifted its factory in modern building in Udyambag, Belgaum for better production. Now PHI is manufacturing small machine tools-Radial and Pill Drilling Machines, Centre Lathes, Vertical Spindle Surface Grinders, Tool and Cutter Grinder, Filing Machine. All machines are designed and manufactured indigeneously. Machine tools are produced with good quality of Raw Materials, rigorous quality control and skilled workmanship. PHI is known for producing Finest Quality of machine tools in small sector, for Reliability and prompt after sales service.

**( Address )**

R. S. No. 695-C, Near Rani Channamma Nagar, IInd Stage, Udyambag, BELGAUM - 590 008. (INDIA) Phone: +91 - 831 - 2441626,2442390 Fax: +91 o 831 - 2445026 Mobile: 09448395664 E-mail: phibgm@gmail.com

**Manufacturers of :** Machine Tools, Radial Drilling Machines, Surface Grinders, Filing Machines, Tool & Cutter Grinders etc.

**Sheet Metal Parts :** Air Cleaner Housing, Pre cleaners, Silencers, Tanks, Hoods, Pipe Bends etc.



DRILLING MACHINE
Model - PRD - 7 / PRD -10




**MANUFACTURE OF MILD STEEL SHEET METAL PRESSED COMPONENTS & ASSEMBLIES LIKE...**

- Exhaust Manifolds
- Various size elbows, bend pipes for Air, Water, oil circulation
- Housings for Air Cleaner Filters.
- Exhaust Connections
- Fuel Tanks
- Brackets, clamping rings, covers etc.
- Exhaust Silencers.



(VERTICAL SPINDLE SW VELLING HEAD ROTARY TABLE)
SURFACE GRINDER
Model - ACCUGRIND 300 /400 /450

OKUMA HMC
MA-600 HB



HAAS TURNING CENTRE



HAAS VMC
VF3YT



**Machining of :** Heavy Cast Iron & Steel Components on Turning Center VMC, HMC & Conventional Set up

**MACHINERY AT PHI**

- HMC (Okuma) 1000mm X1000mm X 950mm (Twin Pallet) Spindle HSK 100
- HMC (Mitsui Seiki) 800mm X 800mm X 750mm (Twin Pallet)
- VMC (Haas) 1016mm X 660mm X 635mm
- Turning Centre (Haas) Turning dia 530 swing 800
- Balancing Machine (300 dia max weight 50kg) Conventional setup (Lathe, drilling, milling, VTL machine, horizontal grinding, cylindrical grinding etc.)

**MEASURING INSTRUMENTS/ TESTING EQUIPMENTS**

- Trimos-1 meter accuracy 1 micron
- Surface Roughness Tester
- Granite Surface Plate (size 1800mm x 1200mm x 200 mm)
- External facility for CMM (3000mm X 1500mm) at B.F.C
- Other measuring instruments like micro meter, vernier caliper, vernier height guage, bore dial guage etc.



आपला मुलगा/मुलगी
देशाबाहेर आहे का ?
**इंटरनेट** वरून
त्यांना संपर्क करताना
त्रास होतो ?

आम्हाला कॉल करा
आम्ही आपला त्रास
स्वस्त दरात कमी करू.



**SDS ENTERPRISES**

**Sales**
- Desktop
  - a. Branded
  - b. Assembled
- Laptops
- Tables
- Printers
- Accessories

**Repairs**
- Desktop
- Laptop
- Accessories

**Solutions**
- On Internet
- Network
- Web
- Annual Maintenance
  - a. Desktop
  - b. Laptops
  - c. Network
  - d. Printers

संपर्क
**Shantanu Gurjar**
**9890990112**
**9326209282**
shantanu@sdsenterprises.net

# इन्शुरन्स स्पेशालिस्ट
सुरक्षित करा आपले भवितव्य




**सर्व प्रकारच्या विमा योजना एकाच ठिकाणी उपलब्ध.**

१) जीवन विमा
२) आरोग्य विमा (मेडिक्लेम)
३) वाहन विमा
४) अपघात विमा
५) प्रवासी विमा
६) मालमत्ता (प्रॉपर्टी) विमा
७) संस्थेचा विमा
८) सागरी (मरिन) विमा
९) सामुदायिक विमा(ग्रुप इन्शुरन्स)
१०) अनिवासी भारतीय विमा



मंगेश जांभेकर
मोबाईल : ९८१९७ ५०९५५
Email : mangesh.jambhekar@gmail.com
Office Add.: Cabin No. 2, Prime Space Business Centre, So Lucky HSG. Society M. G. Road, Above Sunder Hotel, Vile Parle East, Mumbai 400057


# जोडी-जोडी

कथा-गोष्ट ही जोडी-जोडीची
हासत-खेळत ठेवेल तुम्हांसी ।।
उपमा-पोहे, मेदुवडा-इडली
सकाळच्या नाष्ट्यात असते हल्ली ।।
चहा-कॉफीची लज्जत भारी
त्यांच्याशिवाय जीव गुदमरी ।।
तिखट-मीठ अदृश्य झाले
प्रत्येक पदार्थात उठून दिसले ।।
खोबरं-कोथिंबीर चिरचिर भारी
मसाले भातावर पसरली सारी ।।
चटणी-लोणचे गुरगुरत राहिले
डाव्या बाजूस खेटून बसले ।।
आमटी-वरण रडत बसली
पानात चहुकडू वहात गेली ।।

कांदा-बटाटा भांडत बसले
डोसा भाजीत एकत्र झाले ।।
सार-सूप जरी जुळ्या बहिणी
पानात दिसते एकच एकावेळी ।।
पापड - कुर्ड्या भाव खात बसले
वाऱ्याबरोबर दोघेहि उडाले ।।
श्रीखंड-बासुंदी खुदुखुदु हसली
एकीलाच खवय्यांनी जवळ केली ।।
बटाटा वडा-भजीत झाले भांडण
त्यांच्याशिवाय मिळमिळीत जेवण ।।
कांदा-लसूण शेफारले गेले
वाटण-वाटण्यात चिरडून मेले ।।
फुलका-पोळी अवघडून बसली
पान मोठे दिसताच पथारी पसरली ।।

ताक-लस्सी यातील एकतरी हवे
जेवणाची सांगता कशी होईल बरे ?
ताट-वाट्या पसरल्या गेल्या
जेवण संपताच एकात एक बसल्या ।।
आइस्क्रीम-कुल्फी कोपऱ्यात उभी
दोन तीन वेळा खवय्यांनी खाल्ली ।।
पान-सुपारी असो वा मुखवास
जाता-येता मुलं खाई हमखास ।।
संपली हो कथा-गोष्ट जोडी-जोडीची
थोडी फार करमणूक झाली ना तुमची ?

**प्रदीप पु. सातवळेकर**
एफ/२४, पाम एकर्स सोसायटी,
मुलुंड (पूर्व), मुंबई. भ्र: ९८६९६८३३३५



।।श्री।।

स्थापना : गणेश चतुर्थी १९९३

सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा

प्रकाश जठार यांचे

# ज्योती एन्टरप्रायझेस

(निवडलेला किराणा माल, सर्व प्रकारचे मसाले व सुका मेवा होलसेल व रिटेल भावात मिळण्याचे एकमेव ठिकाण)

पत्ता – गाळा नंबर २, गिरीश अपा., गोपाळ नगर, गल्ली नंबर २, डोंबिवली (पूर्व) पिन – ४२१२०१,

फोन–०२५१२४४१२१२, भ्रमणध्वनी – ९८१९२५१४१२

**ऋणानुबंध घराण्यांचे, संस्कार पिढ्यान् पिढ्यांचे**

(व्यवस्थापन)

**श्री अन्नपूर्णा केटरर्स**

(समर्थ डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन यांच्या मालकीचे)

# श्रुति मंगल कार्यालय

आमचे मार्गदर्शक व आमचे सद्गुरू

।।श्री दिगंबरदास महाराज।।

यांच्या आशिर्वादाने श्रुति मंगल कार्यालयानं मंगल कार्याची परंपरा निर्माण केली व जपली आहे. विवाह, मौंजीबंधन अथवा कोणताही समारंभ या सर्वांतून दृग्गोचर होते घराणे व सुसंस्कृतपणा हा समारंभ संपन्न करणाऱ्या परिवारांचा. अशा साजऱ्या होणाऱ्या समारंभासाठी सुयोग्य वास्तू उपलब्ध करून देणे जिला असेल पावित्र्य मंदिराचे, जेवण असेल अन्नपूर्णेचे, सौंदर्य असेल वास्तूरचनेचे, सुख असेल आधुनिकतेचे हेच श्रुति मंगल कार्यालयाचे 'ध्येय'. बाकी कार्य सिद्धीस नेण्यास श्री समर्थ आहेतच.

**मंगल कार्यासाठी दोन स्वतंत्र हॉल**

**दुर्गा हॉल** : पहिला मजला – ३६०० चौ. फुट
वधू–वर पक्षासाठी प्रत्येकी २ खोल्या

**जानकी हॉल** : दुसरा मजला – ३६०० चौ. फुट
वधू–वर पक्षासाठी प्रत्येकी २ खोल्या (टेरेस १००० चौ. फुट)
सर्व खोल्या सेल्फ कन्टेन्ड, प्रशस्त पार्किंग, हवेशीर, भरपूर उजेड, मध्यवर्ती, उत्कृष्ट भोजन, उत्तम वाढप व्यवस्था, लिफ्टची सुविधा, शिवाय दोन मोठे जिने हे सर्व अत्यंत वाजवी दरात

**श्री अन्नपूर्णा केटरर्स**
श्री. प्रभाकर र. काजरेकर
**श्रुति मंगल कार्यालय**

१२३६, आपटे रस्ता, डेक्कन जिमखाना, पुणे – ४११ ००४
दूरध्वनी : ०२०–२५५३१७४९, २५५२१४४० फॅक्स : ०२०–२५५२१९९८
Website : www.shrutimangal.com E-mail : hrishikesh@shrutimangal.com

## WITH BEST COMPLIMENT FROM:






## J.P.F METACAST PVT LTD

PLOT NO. 7, 16, 29 MACCHE INDUSTRIAL ESTATE
BELGAUM - 590014 KARNATAKA, INDIA
Ph: 0831-2440664 Fax : 0831-2441069
E-mail : admin@jpfmetacast.com
www.jpfmetacast.com

***Manufacturers of all types of Cast iron and Ductile Iron castings***

- An ISO 9001 : 2008 certified company
- Winner of National Quality Award in SSI - 1998
- Winner of Rajeev Gandhi National Quality Award - 2007
- Winner of Jayaswal Neco Best Quality award from Institute of Indian Foundrymen - 2012
- Winner for Best Operations Management from S.P.Jain Institute of Management and Research, Mumbai 2014

**Industries Served :** Diesel Engines, Tractors, Compressors, Road construction Machineries, Machine Tools ,etc








# कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाच्या
# रौप्यमहोत्सवी कार्यक्रमातील
# 'क्षणचित्रे'











Regd.Periodical RNI- No. MAHAMAR/2013/51438 (DECL.No. SDM/PUNE/SR/89/2013)





जिथे सकाळ पक्ष्यांच्या गोड किलबिलाटाने जागी होते, सगळे ऋतू आपलं सौंदर्य मुक्तपणे उधळतात, अशा पलाश बुलेव्हर्ड मध्ये आपलं स्वागत !

पुण्यातील निसर्गरम्य पिरंगुट येथे तयार होत असलेल्या या १ व २ बीएचकेच्या गृहप्रकल्पात तुम्हाला अनुभवता येईल तुमचं रम्य बालपण आणि आधुनिक सुख - सुविधांचा सुंदर मेळ! इथल्या बुलेव्हर्डच्या गार सावलीत कट्ट्यावरच्या गप्पाही छान रंगतील !

आयुष्याचा आनंद पुरेपूर लुटायचा तर तो इथेच !

**Amenities**

• Club House • Multi-Purpose Hall • Gym • Party Lawn • Ganesh Temple • Senior Citizens' Park • Landscape Garden • Jogging Track • Kids' Play Zone • Indoor Games

www.9studioworks.com

VJ | VILAS JAVDEKAR DEVELOPERS

enquiry@javdekars.com | www.javdekars.com

Corporate Office: 306, Siddharth Towers, Sangam Press Road, Kothrud, Pune-411038, India. **Tel.: +91-20-6620-8000**

Site Address: Pirangut Valley, Gat No. 510, Behind Aditya Nisarga, 2 kms before Pirangut, Pune, India. **Mob.: +91-85549 82916**


**BOOK -POST(Regd. Periodical)**

**प्रेषक:**

**संपादक - कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे 'संपर्क'**
**कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ**
**द्वारा - कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ,**
**'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ,**
**पुणे- ४११ ०३०**

**To,**

3058 14 01/18
Shri. Mirashi Sunilchandra Vishwambhar
5 B, II phase, Shivnagari Apartment,
Opp. Sai Mandir, Hadapsar,
Pune 411028

Pune 411028

